मनासारखा निवांतपणा...!
निवांत हिल रिसॉर्ट
NIVANT HILL RESORT
38/3/1, Sambarwadi ( Yevteshwar ),
Satara - Kaas Road, Satara - 415002
Tel. 02162 - 282678 / 282679
e-mail : enquiry@nivantresort.com
www.nivantresort.com
A complete family restaurant on the hill

सातारा जिल्ह्यातील एकमेव नि:पक्ष व निर्भिड दैनिक

स्थापना १९३५

# ग्रामोध्दार

कैलास किराणा फुड्स ॲण्ड सर्व्हिसेस
सर्व प्रकारचे तांदूळ मिळेल.
चायनीज व हॉटेलसाठी लागणारे सर्व मटेरियल मिळेल.
रेनबो मसाले : सर्व प्रकारचे डाळी व कडधान्य मिळेल.
आता नवीन वास्तूत आपल्या सेवेत
पनीर, ग्रीनपीस, खवा, बटर, फिंगर रोल, मलबार पराठा,
मिक्स व्हेज, चिज, दही, श्रीखंड, आम्रखंड, फ्रेश क्रिम, बासुंदी
7030555460 / 8329227653 / 8975771111 / 9422915190 / 9923741290
पत्ता: ११७९,३,१५,शुक्रवार पेठ, सातारा-४१५००२

सातारा || वर्ष : ९० वे || अंक : १४० || सोमवार, दि. ०९ सप्टेंबर २०२४ || किंमत २ रुपये || RNI No. 11460/1957 www.gramoddharnews.com www.facebook.com/gramodhar पाने – ८

## सोन्याचा चमचा तोंडात घेऊन येणाऱ्यांना १५०० ची काय किंमत!

### आळंदीमधून मुख्यमंत्र्यांची विरोधकांवर फटकेबाजी

**आळंदी :** वारकरी संप्रदायातील मानबिंदू शांतीब्रह्म ह. भ. प. मारोती महाराज कुरेकर बाबा यांच्या ९३ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज आळंदीच्या दौऱ्यावर आहेत. आळंदीमधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्य मंदिरात जाऊन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच बळीराजाला सुखी आणि समाधानाचे दिवस येऊ देत असे साकडे देखील घातले. त्यानंतर महाराज कुरेकर यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शांतीब्रम्ह पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारकऱ्यांना संबोधित केले. माझ्या आयुष्यातील आजचा कार्यक्रम हा सर्वात आगळा-वेगळा आहे. वारकऱ्यांमध्ये येण्याचे भाग्य लाभते, याहून दुसरे पुण्य काही नाही. आज गुरू-शिष्यांचा वाढदिवस आहे, यापेक्षा मोठं काय असू शकत. खरं म्हणजे आम्ही मुख्यमंत्री असलो किंवा सरकार असलो तरी राजकीय अधिष्ठानापेक्षा तुमचं स्थान नक्कीच मोठं आहे, असे म्हणत भाषणाची सुरुवात केली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर चांगलाच निशाणा देखील साधला.

सरकारने आजपर्यंत ६०० निर्णय घेतले, पण

गेल्या दोन अडीच वर्षांपासून महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. या सरकारने आजपर्यंत ६०० निर्णय घेतले. परंतु अनेक निर्णय हे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेखाली दबून गेले आहेत. महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली. एखादी योजना लगेच सुरू करता येत नाही त्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. मी सामान्य घरातला मुलगा आहे. आईची काटकसर बघितलेला मुलगा आहे. काही लोक १ हजार ५०० रुपयांत विकत घेता

(पान ६ वर)



## दीड दिवसाच्या बाप्पाला उत्साहात निरोप

**मुंबई :** गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकरच या, अशा जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात गणेशभक्तांनी दीड दिवसांच्या बाप्पांना रविवारी भक्तीपूर्ण वातावरणात निरोप दिला.

गणेश विसर्जन शांततेत व्हावे यासाठी पोलिसांनी तर सुव्यवस्थित व्हावे यासाठी महापालिकेने जय्यत तयारी केली होती. मुंबईत सुमारे दीड लाख घरगुती गणपती प्रतिष्ठापना झाली असून त्यातील दीड दिवसाच्या ७५ हजार गणपतींचे विसर्जन झाल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.

महापालिकेने प्रतिवर्षाप्रमाणे बाप्पाच्या विसर्जनासाठी मुंबईत शंभरहून अधिक ठिकाणी विसर्जनाची सोय केली आहे. त्यात ६९ नैसर्गिक स्थळांवर तर ३२ कृत्रिम तलावांचा समावेश आहे. गणेशोत्सवासाठी सुमारे साडेसात हजार अधिकारी व कर्मचारी तैनात केले आहेत.

विसर्जन स्थळांवर जीवरक्षक, रुग्णवाहिका, प्रथमोपचार केंद्र, ध्वनिक्षेपक, मोटरबोट, स्वागत कक्ष, चौकशी व नियंत्रण कक्ष, स्टील प्लेट, तात्पुरती शौचालये, निर्माल्य कलश, निरीक्षण मनोरे, फ्लड लाइट, सर्च लाइट, डंपर, जर्मन तराफे, विद्युत व्यवस्था, मनुष्यबळ, हॅम रेडिओ, अग्निशमन दल, आपत्कालीन व्यवस्थेत दहा टक्क्यांनी वाढ करण्यात आल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.

गणेशोत्सवासाठी मुंबई पोलीसही दल सज्ज आहे. सुमारे पाच हजार सीसीटीव्हीच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक हालचालीवर सुरक्षा यंत्रणेचा बारीक वॉच राहणार आहे. शिवाय शहरांत वाहतुकीचा खोळंबा होऊ

(पान ६ वर)

## बारामतीत असं होणार असेल तर उभं न राहिलेलं बरं;

### अजित पवारांचे विधानसभा न लढविण्याचे संकेत?

**बारामती:** एवढी कामं करूनही बारामतीत असं होणार असेल तर आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवावी. कारण लाखानं निवडून येणारी आपण माणसं. जर बारामतीत असं होणार असेल तर उभं न राहिलेलं बरं, अशा शब्दात विधान सभा निवडणुकीबाबत उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी संकेत दिले आहेत.

बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना पवार पुढे म्हणाले, काम करुनही अशी गंमत होणार असेल तर मग झाकली मूठ सव्वा लाख रुपयांची राहिलेली बरी. मी आता ६५ वर्षांचा झालोय. मी तसा समाधानी आहे. जिथे पिकतं, तिथे विकत नसतं. ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्या. एकदा काय झालं पाहिजे. कोणीतरी मी सोडून दुसरा आमदार बारामतीला मिळाला पाहिजे. मग तुम्ही १९९१ ते २०२४ पर्यंतच्या माझ्या कामांची तुलना करा, असे आवाहन देखील पवार यांनी केले.

पवार म्हणाले, बारामतीकरांच्या नादाला लागायचं काम नाही. बारामतीकरांना शिकवायला जाऊ नका मला उडवून लावलं तर तुमचं काय? असे पवार म्हणाले. पवार साहेबांनी कधी अर्थ खाते स्वतःकडे ठेवलं नाही. त्यांनी मुख्यमंत्रिपदासह अनेक पदं भूषवली. मंत्रिपद माझ्याकडे आल्यानंतर मी अर्थ खातं घेतलं आणि त्यामध्ये निधी कसा आणता येईल याचा विचार केला. अर्थ खात्यावर कुणीतरी काहीतरी बोललं, बोलणाऱ्यांना बोलू द्या तुम्ही त्यात लक्ष घालू नका आम्ही तिकडे बघू, असं अजित पवार म्हणाले. मला अनेक कामं करायची आहेत. करायचं की नाही करायचं, हे



तुमच्या हातात आहे. मी पण माणूस आहे. इतकं करून देखील मला हे बघावं लागत असेल, जिथे मी दुसऱ्याला खासदार, आमदार करतो तिथे जर अशी परिस्थिती होणार असेल तर झाकली मूठ सव्वा लाखाची राहिलेली बरी, असे पवार म्हणाले.लोकसभा निवडणुकीचा पराभवाची सल अजुन देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मनात अजुनही असल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आह .पवार यांनी विधानसभा

(पान ६ वर)

## अजित पवारांच्या वक्तव्यावर जितेंद्र आव्हाडांचं आव्हान



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीचा पराभव जिव्हारी लागल्यानंतर अजित पवारांनी अनेकदा अनेक गोष्टींची कबुली दिली. बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवारांना उमेदवारी द्यायला नको होती इथपासून कुटुंबातील फूट समाजात स्वीकारला जात नाही, याचा अनुभव मीही घेतलाय इथपर्यंत अजित पवारांची वक्तव्ये कायम चर्चेत राहिली. त्यांच्या या वक्तव्यावरच शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिलंय. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अजित पवारांवर टीका केली.

एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा, असं आज अजित पवार म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, अजित पवार बारामतीतूनच लढणार. लोकांची मानसिकता संभ्रामवस्थेत नेणं ही एक कला आहे. या कलेचा ते वापर करत आहेत. बारामती त्यांच्यामुळे उभी राहिली हे त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. बारामती उभी राहिली ती पवारांमुळे, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

अजित पवारांनी पत्रकारांना सांगावं की

अजित पवारांनी पक्ष हिसकावून घेतला. राजकीय करामती केल्यात. एवढा पश्चाताप घर फोडण्याचा होत असेल तर जाऊन एकदा पत्रकारांना सांगा हा पक्ष मी शरद पवारांच्या घरातून चोरून आणला आहे, आणि मी आता त्यांना देऊन टाकतो. मी माझी निशाणी घेऊन लढतो, असं आव्हान जितेंद्र आव्हाडांनी दिलं.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांची दादागिरी होती. एकही माणूस त्यांच्याविरोधात ब्र सुद्धा काढायचा नाही. तो त्यांना घाबरून नाही. ही तक्रार पवारांपर्यंत गेली तर पवार नाराज होतील, या भीतीने. आता तसं नाहीय. आता तिथे ना पवार साहेब आहेत आणि कोणी कोणाला घाबरत नाही, असंही ते म्हणाले. वेळोवेळीच्या मुख्यमंत्र्यांचा अजित पवारांनी केलेला जाहीर अपमान आम्ही सर्वांनी पाहिला आहे. पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण यांचा त्यांनी अपमान केलाय. सहकाऱ्यांना तुच्छ पणाची वागणूक मिळायची. पवारांमुळे कोणीही बोललं

(पान ६ वर)

## मनोज जरांगे-धनंजय मुंडेंची गुप्त भेट,

### लोकसभेतील फटका विधानसभेमध्ये बसू नये यासाठी मुंडेंची हालचाल?

**बीड :** मध्यरात्री राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि मराठा आरक्षणाचा लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांची भेट झाली. अर्थात ही गुप्त भेट सकाळ होताच उघड झाली. ही भेट झाल्याची जरांगे पाटलांनी कबूलसुद्धा केले. मात्र धनंजय मुंडे यांनी मात्र अशी भेट झालीच नसल्याचे सांगितले. मनोज जरांगे आणि धनंजय मुंडेंच्या या गुप्त भेटीनंतर बीडसह मराठवाड्याच्या राजकारणावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.





परळीतील नाथ प्रतिष्ठानच्या सार्वजनिक गणेश मंडळाचे धुमधडाक्यात आगमन झालं. रात्री साडेदहा ते साडेअकरा वाजेपर्यंत धनंजय मुंडे यांच्या या व्यासपीठावर मपुष्पाफ फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना, क्रिती सेनन यांच्यासोबतच राज्यातील दिग्गज कलावंत सहभागी झाले होते. खरं तर हा कार्यक्रम जरी गणेश उत्सवाचा असला तरी धनंजय मुंडे यांनी मात्र त्यांच्यावर टीका करणाऱ्याला या भाषणात झोडून काढले.

परळीच्या कार्यक्रमानंतर अंतरवालीकडे गाड्यांचा ताफा वळला

अर्थात हा सगळा कार्यक्रम सगळ्या समोरच फुलला होता. मात्र त्यानंतर रात्री १२ वाजताच धनंजय मुंडे यांच्या ताफ्यातील गाड्या अंतरवली सराटीकडे वळल्या. यावेळी कुणालाच माहीत नव्हते की आता मनोज जरांगे पाटलांना भेटायला जायचे आहे. दोन तासात धनंजय मुंडे अंतरवाली सराटीला पोहोचले. आंतरवालीच्या सरपंचाच्या घरी धनंजय मुंडे थांबले आणि थोड्याच वेळात मनोज जरांगे पाटील हे त्या ठिकाणी आले. यावेळी धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये बरीच चर्चा झाली.

भेट अत्यंत गुप्त ठेवण्यात आली

या भेटीमध्ये इतकी गुप्तता पाळण्यात आली होती ती या ठिकाणी कुणीही फोटो काढला नाही अथवा व्हिडिओ घेतला नाही. मात्र तिकडे दिवस उजाडला आणि या भेटीची चर्चा सुरू झाली. अर्थात मनोज जरांगे पाटील यांनी ही भेट झाली असल्याचे स्पष्ट सांगितले. मात्र

(पान ६ वर)

## भारतात मंकीपॉक्सचा संशयित रुग्ण, आरोग्य मंत्रालयाने जारी केले निवेदन

**दिल्ली :** मंकीपॉक्स आजाराची रुग्णसंख्या वाढत असल्याने जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे.तर आता भारतातही संशयित मंकीपॉक्स रुग्णाची नोंद झाली आहे. आरोग्य मंत्रालयाने यासंदर्भातील माहिती दिली असून या रुग्णाला विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. आफ्रिकन देशांत एमपॉक्स म्हणजेच मंकीपॉक्सची साथ वाढत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने या साथीला जागतिक स्वास्थ्य आणीबाणी घोषित केले आहे. गेल्या तीन वर्षांत दुसऱ्यांदा ही वेळ आली आहे. आफ्रिकेतील बाराहून अधिक देशांत पसरत असलेल्या या साथीवर तातडीने उपाययोजना




करण्याची गरज संघटनेने व्यक्त केली आहे.

आरोग्य मंत्रालयाने निवेदनात म्हटलं आहे की, संशयित रुग्णाला रुग्णालयात दाखल करून विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे. मंकीपॉक्सच्या आजाराची स्थिती जाणून घेण्यासाठी त्याच्या रक्ताच्या नमुन्यांची चाचणी केली जात आहे. मंकीपॉक्सचे विषाणू असलेल्या देशातून त्याने प्रवास केल्याने हा संशय बळावला आहे.

आरोग्य विभागाच्या नियमानुसार रुग्णाला विलग करण्यात आले आहे. संभाव्य स्रोत ओळखण्यासाठी आणि संसर्ग जाणून घेण्याकरता

(पान ६ वर)

## संक्षिप्त वार्ता

### मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**मुंबई :** शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

### सांगलीत गणेशाचे ध्वनिक्षेपकांच्या भिंती, ढोल-ताशांच्या निनादात मिरवणुका



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सांगली :** गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात आणि आबालवृद्धांच्या आनंदात शनिवारी गणेशाचे मोठ्या थाटात आगमन झाले. दुपारपर्यंत घरगुती गणेशाची प्रतिष्ठापना केल्यानंतर सायंकाळपासून ध्वनी मर्यादेचे सर्रास उल्लंघन करणाऱ्या ध्वनिक्षेपकांच्या भिंती, ढोल-ताशांच्या निनादात सार्वजनिक मंडळाच्या स्वागत मिरवणुका सुरू झाल्या. सांगली संस्थानच्या गणेशाची विधिवत राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये प्रतिष्ठापना करण्यात आली.

यंदा पाऊसकाळ चांगला असल्याने गणेशोत्सव थाटात साजरा होत असून गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले आहे. सांगली शहरातील पुष्पराज चौक, गणपती पेठ, कुंभार गल्ली, विश्रामबाग गणेश मंदिर आदी ठिकाणी गणेशमूर्तींचे स्टॉल लावण्यात आले होते. सकाळपासून श्रींची मूर्ती घरी नेण्यासाठी भाविकांनी याठिकाणी गर्दी केली होती. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात गणरायाचे घरोघरी आगमन झाले.

सांगलीच्या श्री गणपती पंचायतन संस्थांनच्या सरकारी गणपती उत्सवाला आजपासून मोठ्या भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. सकाळी गणेश मंदिरातून दरबार हॉलपर्यंत सरकारी गणपतीच्या श्रीची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर राजवाडा परिसरातील दरबार हॉल येथे सरकारी गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणपती संस्थानचे युवराज आदित्यराजे पटवर्धन यांच्या हस्ते सरकारी गणपतीची प्रतिष्ठापनेची आरती करण्यात आली. यावेळी श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन, राणीसाहेब राजलक्ष्मी पटवर्धन आणि राजकन्या पौर्णिमा पटवर्धन, व्यवस्थापक जयदीप अभ्यंकर यांची विशेष उपस्थिती होती. आजपासून सरकारी संस्थानच्या गणपती उत्सवाला भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. या पाच दिवसाच्या उत्सवामध्ये संगीतमय कार्यक्रम, पानसुपारी आणि विसर्जन मिरवणूक असे कार्यक्रम आहेत. गणेश उत्सवात होणारी गर्दी लक्षात घेऊन शहरातील काही मार्ग पोलिसांनी वाहतुकीसाठी बंद केले होते. तर ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अहो, गणपती माझा नाचत आला

_आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाचे वेध भक्तांना खूप आधीपासून लागलेले असतात. गणपतीचं आगमन, त्याची पूजा, गणेशोत्सवाचा सोहळा आणि गणेश विसर्जन महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात गणपतीची माहिती प्रत्येकाला आहे. एवढंच काय तर अगदी विदेशातही धूमधडाक्यात गणेशोत्सव साजरा केला जातो. जितक्या उत्साहाने गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीचं आगमन होतं. सर्वांकडून गणेश चतुर्थी शुभेच्छा दिल्या जातात. तितक्याच भावनात्मकरित्या गणरायाला शुद्धसात्विक मनाने निरोपही दिला जावा, अगदी सूज्ञ होऊन. या आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनापासून तर मूर्तीच्या निरोपापर्यंतच्या दिवसांची म्हणजेच गणेशोत्सवाची माहिती मराठीत सांगणारा मार्गदर्शक लेख श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींचा खास गणेश भक्तांसाठी... संपादक.



–

**गजानना तू गणराया।**
**आधी वंदू तुज मोरया।।**

भारतीय सौरवर्षानुसार भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणेश चतुर्थी साजरी केली जाते. गणपती बाप्पाचा जन्मदिवस म्हणून गणेशचतुर्थी साजरी केली जाते. असे मानले जाते, की भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षादरम्यान गणपती अर्थात गण+पती = गणांचा अधिपती या देवाचा जन्म झाला होता. इंग्रजी वर्षानुसार हा दिवस ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात येतो, तो चार्तुमासाचा काळ असतो. चार्तुमास हे चार महिने अनेक सणांनी युक्त असतात. संपूर्ण भारतासह विदेशातही लोक आपापल्या परंपरेनुसार दीड दिवस ते अगदी अकरा दिवसापर्यंत गणपतीची स्थापना करतात. योग्य माहिती घेऊन जल्लोषात गणेशोत्सव साजरा करतात. भगवान शंकर आणि पार्वतीपुत्र गणपती या बुद्धीच्या देवता आहेत. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी आद्यदेवता गणपतीची स्थापना करून पूजा केली जाते. तसेच हिंदू धर्मात भगवान श्री गणेशाला प्रथम पूजेचा मान दिला जातो. कोणतेही शुभकार्य असल्यावर सर्वात आधी गणपतीची पूजा केली जाते. कारण गणपती विघ्नहर्ता आहे. गणपतीची अनेक नावे आहेत. त्यापैकीच एक नाव विघ्नहर्ता- दुःखहर्ता अर्थात संकटाचे हरण करणारा असे आहे. म्हणून म्हटले जाते-

**तुच सुखकर्ता, तुच दुःखहर्ता।**
**अवघ्या दीनांच्या नाथा।**
**बाप्पा मोरया रे, चरणी ठेवितो माथा।।**

तसंच गणेशोत्सवाचा पहिला दिवस असतो गणेश चतुर्थीचा या दिवशीच प्रारंभ होतो गणेशोत्सवाला. गणेशाच्या आगमनाने सगळीकडेच भक्तीमय वातावरण दिसून येते. या देवतेच्या अवतरणाची कथा अशी-

पार्वती मातेला स्नानासाठी जायचे होते. परंतु आसपास लक्ष ठेवण्याकरता कोणीच नव्हते. तेव्हा तिने आपल्या अंगावरील मळाने एक मूर्ती बनवून ती जिवंत केली. या मूर्तीला पहारेकरी म्हणून नेमले व सांगितले, की कोणालाही आंत येऊ देऊ नकोस. भगवान शंकर काही वेळाने तेथे आले आणि ते आत जाऊ लागले, तोच त्या पहारेकऱ्याने त्यांना अडवले. त्यावर भगवान शंकर संतप्त झाले व त्यांनी त्या पहारेकऱ्याचे शिर धडावेगळे केले. पार्वतीदेवी जेव्हा स्नान करून बाहेर आल्या, तेव्हा हा प्रकार पाहून त्या संतापल्या व अख्खे ब्रह्मांड हादरवून सोडले. अगदी ब्रह्मदेवापासून सगळे देव तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्या कोणाचे काहीही ऐकून घेत नाहीत. तेव्हा शंकर महादेव आपल्या गणाला आदेश देतात, की पृथ्वीतलावर जाऊन सर्वात आधी जो प्राणी दिसेल त्याचे शिर कापून घेऊन ये. गण बाहेर पडल्यावर सर्वात आधी त्याला हत्ती दिसला. तो त्याचे शिर घेऊन आला. भगवान शंकरांनी ते शिर पुतळ्याला लावले आणि त्या मूर्तीला जिवंत केले. हा पार्वतीचा मानसपुत्र गज- हत्ती व आनन- मुख धारी म्हणजेच गजानन होय. शंकर देवाने त्याला गणाचा ईश- गणेश नाव ठेवले. हा दिवस चतुर्थीचा होता. त्यामुळे या चतुर्थीला गणेशचतुर्थी म्हणून महत्त्व आहे. त्यामुळे गणेशचतुर्थीची माहिती ही मराठीतही असणे आवश्यक आहे-

**पार्वतीच्या बाळा, तुझ्या पायात वाळा।**
**ताशाचा आवाज तर्रर्रऽऽऽ.. झाला।**
**अहो, गणपती माझा नाचत आला।।**

गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिकेचे व्रत केले जाते. चांगला पती मिळावा म्हणून कुमारिका, तर आपल्या नवऱ्याला उदंड आयुष्य मिळावे म्हणून सुवासिनी हे व्रत करतात. या दिवशी शंकर देव आणि पार्वती देवीची स्थापना करून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी निर्जळ व्रत करून हा उपास गणेश चतुर्थीला सोडला जातो. गणपतीच्या विसर्जनासोबतच या व्रताच्या पूजेचेही विसर्जन केले जाते. या दिवशी खास हरतालिका शुभेच्छा कुमारिकांना दिल्या जातात. गणेश चतुर्थीला गणरायाचे आगमन होते आणि सुरूवात होते ती गणेशोत्सवाच्या पर्वाला. गणेश चतुर्थी म्हटल्यावर काही महत्त्वाच्या गोष्टी समोर येतात. गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीगणेशाची मूर्ती घरी किंवा सार्वजनिक मंडळाच्या मंडपात आणली जाते. पंचांगातील मुहूर्ताप्रमाणे मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिष्ठापना पूजेमध्ये आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्री आणि नेवैद्य आदी सोळा उपचारांनी षडशोपचारे गणपतीची पूजा केली जाते. गणपतीला आवडणारी लाल जास्वंदीची फुले, शमी आणि दुर्वा तसेच विविध पानेपत्री या पूजेमध्ये वापरली जातात आणि या संस्कृत स्तोत्राचा उद्घोष केला जातो-

**ॐ गं गणपती नमो नमः।**
**श्री सिद्धीविनायक नमो नमः।।**
**अष्टविनायक नमो नमः।**
**गणपतिबाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया।।**

या दिवशी गणपतीची पूजा झाल्यावर उकडीच्या मोदकांचा प्रसाद दाखवला जातो. गणपतीसोबतच त्याचे वाहन असलेल्या मूषक म्हणजेच उंदराचीही स्थापना केली जाते. गणेश चतुर्थीला सुरू होणारा हा उत्सव दहा दिवसानंतर अनंत चतुर्दशीला संपतो. तेव्हाच गणरायाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. पूजेतील महत्वाच्या गोष्टी-

दुर्वा: गणपतीची पूजा करताना नेहमी दुर्वांची जुडी वाहिली जाते. कारण बाप्पाला दुर्वा फारच प्रिय आहेत आणि त्यामुळे गणपती प्रसन्न होतो. गणपतीला नेहमी २१ दुर्वांची जुडी प्रामुख्याने वाहिली जाते. गणपतीच्या डोक्यावर दुर्वा वाहिल्या जातात त्यामागेही एक आख्यायिका आहे. अनलासूर नावाच्या एका असुराने स्वर्ग आणि पृथ्वीवर उच्छाद मांडला होता. त्याच्यापासून सुटका व्हावी म्हणून गणेशाला साकडे घालण्यात आले. गणपतीने त्या अनलासूराला गिळले आणि सर्वांचा त्रास संपविला. पण त्या राक्षसाला गिळल्यामुळे गणपतीच्या पोटात प्रचंड आग सुरू झाली. काही केल्या ती थांबेना. यावर कश्यप ऋषींनी बाप्पाला दुर्वांचा रस प्यावयास दिला. तो प्राशन केल्यावर गणपतीच्या पोटातील आग थांबली आणि तेव्हापासून गणपतीला दुर्वा आवडता झाला. तेव्हापासून गणपती पूजेत दुर्वा आवर्जून वाहिला जातो.

जास्वंद: दुर्वांप्रमाणेच गणपतीला प्रिय आहे ते जास्वंदाचे लाल फूल. कारण गजाननाचा वर्ण शेंदरी किंवा लाल आहे. त्यामुळे त्याच्या पूजेत जास्वंदाच्या लाल फुलाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे त्यास जास्वंदाच्या फुलांचा हार प्रामुख्याने वाहिला जातो.

त्याचा आवडता नैवद्य मोदक: श्री गणेशाला सर्वात प्रिय असणारा नैवद्य म्हणजे मोदक होय. त्याला ११ किंवा २१ मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. हे मोदक नारळाचे सारण आणि तांदळाच्या उकडीने तयार केले जातात किंवा तळणीचेही मोदक केले जातात. आजकाल तर मोदकांमध्ये अनेक प्रकार उपलब्ध आहेत. गणेश चतुर्थीच्या प्रचलित आख्यायिके प्रमाणे एकदा गणेश महाराज चतुर्थीला आवडते मोदक खाऊन आपल्या आवडत्या वाहनावरून- उंदराच्या पाठीवरून जात होते. तेव्हा वाटेत साप पाहून उंदीर घाबरून भीतीने थरथरू लागला. त्यामुळे गणराय उंदरावरून खाली पडले. त्याच्या पोटातून मोदक बाहेर आले. त्यांनी ते सारे मोदक पुन्हा पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून चंद्र हसला, म्हणून गणेशजीने त्याला शाप दिला, की चतुर्थीला कोणीही चंद्राचे दर्शन घेणार नाही. जो त्याला बघेल, त्याच्यावर चोरीचा आळ येईल! अशी आख्यायिका प्रचलित आहे. त्यामुळे आजही लोक चतुर्थीला चंद्राकडे बघणे निषिद्ध मानतात.

गणपतीची आरती सगळीकडे सर्वप्रथम म्हटली जाते. ही आरती समर्थ रामदास स्वामी यांनी रचली आहे. गणेश चतुर्थीला घराघरात ही आरती ऐकू येते. प्रचलित गणेशोत्सवाच्या पूर्वी श्री समर्थ रामदास स्वामींनी हा उत्सव सुरू केल्याची नोंद इतिहासात आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जातो. पेशव्यांच्या काळापासून गणेशोत्सव घरगुती उत्सवाच्या स्वरूपात साजरा करत असल्याचे उल्लेख आहेत. लोकमान्य टिळकांनी ब्रिटीशांच्या काळात समाजातील एकी वाढण्याकरिता या उत्सवाला सार्वजनिक स्वरुप दिले. तेव्हापासून गणेशोत्सव हा घरगुती आणि सार्वजनिकरित्या साजरा केला जातो. महाराष्ट्रासोबतच भारतातही या गणेश चतुर्थी आणि गणेशोत्सव साजरा केला जातो. गणपती या देवतेची लोकप्रियता जगभरात आढळते. भारतासोबतच विदेशातही गणेश चतुर्थी आणि गणेशोत्सव साजरा केला जातो. भारतातून गणपतीच्या मूर्ती विदेशात पाठवल्या जातात. तिथे त्यांची प्रतिष्ठापना करून गणेश चतुर्थी पारंपारिकरित्या उत्साहात साजरी केली जाते. तिथेही खास गणेश चतुर्थीला मोदकांचा प्रसाद दाखवून षडशोपचारे पूजा केली जाते. उकडीच्या मोदकांना गणेश चतुर्थीला विशेष महत्त्व असते. कारण हा गणपतीला आवडता प्रसाद आहे. गणेश चतुर्थीला पारंपारिकरित्या तांदूळ, गूळ आणि नारळ यांच्यापासून बनवलेले उकडीचे मोदक नैवेद्य असतात.

मग यंदा आपणही गणेशोत्सवाची इत्यंभूत माहिती घेऊया. मूर्ती शाडूमातीची आणू, जी लवकर विरघडेल. बाप्पाच्या उत्सवभर मादकपदार्थ सेवन व धुम्रपान बंदी ठेवू, ज्यामुळे हाणामारी व झगडे होऊ नयेत. एक गाव, एक गणपती अमलात आणू. कला कौशल्यपूर्ण व समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करू. वाद्य व ध्वनीक्षेपक यांचे आवाज कानठळ्या बसविणारे नसतील, कारण विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होऊन अभ्यास बुडतो. रात्री दहानंतर शांतता राखू. घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन घरीच बादलीत करू. सार्वजनिक मूर्तींसाठी कृत्रिम हौद तयार करून तेथे विसर्जन उत्साहात करू. कारण नदी, नाले, तलाव यांतील पाणी स्वच्छ ठेवणे आपले गावकऱ्यांचे परमकर्तव्य बनते. पूजेतील निर्माल्य- पानेपत्री, पुष्प, हार, तुरे, तोरण, अक्षदा, प्रसाद आदी साहित्य पाण्यात विसर्जित न करता ते एकत्रितपणे खड्ड्यांत पुरू. गटबाजी व जातीय तेढ निर्माण करणाऱ्या भडकावू घोषणांना आवर घालू. कोरोनानंतरच्या या काळात पुन्हा एकदा अशा हितकर नियमांचे पालन करत जल्लोषाने गणेश चतुर्थीसह गणेशोत्सव व गणेश मूर्तीविसर्जन साजरे करू चला. लाडका गणपती बाप्पा नियमांचे पालन करण्यास सर्वांना बुद्धी देवो! बुद्धीदाता गणेश सर्वांना अशी सुमती प्रदान नक्कीच करेल, या अपेक्षेसह-

**ओंकार प्रधान रूप गणेशाचे!**
**अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णू!**
**मकार ते रूप महेशाचे!!**
**गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!**
**!! गणेशोत्सव निमित्ताने सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली,**
**व्हॉटसप नं- ९४२३७१४८८३.**

## दैनंदिन राशिभविष्य

**आज सोमवार, आज सकाळी ७.३० ते ९ या वेळेत राहु काल आहे. या काळात प्रवास, प्रयाण, नविन व्यवहार, सरकारी कामे, महत्त्वाच्या गाठीभेटी इ. कामे वर्ज्य करावीत.**

**शके १९४६, क्रोधीनाम संवत्सर, भाद्रपद शुक्ल षष्ठी, सोमवार, दि. ९ सप्टेंबर २०२४, चंद्र - तुला राशीत सकाळी ११ वा. २९ मि. पर्यंत नंतर वृश्चिक राशीत, नक्षत्र - विशाखा सायं. ६ वा. ०४ मि. पर्यंत नंतर अनुराधा, सुर्योदय- सकाळी ०६ वा. २६ मि. , सुर्यास्त- सायं. १८ वा. ४५ मि.**
**नमस्कार आज चंद्र तुला राशीत स. ११ वा. २९ मि. पर्यंत रहात असून नंतर तो वृश्चिक राशीत रहाणार आहे. आजचा दिवस वैधृती वर्ज्य दिवस आहे. आज चंद्र - बुध केंद्रयोग होत आहे. आजचा दिवस सर्व राशींना संमिश्र स्वरुपाचा जाईल.**

गार्गी ज्योतिषालय
**ॲड. सौ. स्वप्ना पवार**
**(बीएसएल. एलएलएम, ज्योतिष विशारद)**
**संभाजीनगर कमानीजवळ, ता. जि. सातारा**
**मो. ९८२२३०३०५४**






मेष : आज आपण आपली दैनंदिन कामे शक्यतो दुपारपुर्वी उरकून घ्यावीत. दुपारनंतर काहींना निरुत्साह जाणवेल. प्रवास टाळावेत. मनोबल कमी राहील. दुपारनंतर काहींना मनस्ताप संभवतो.

वृषभ : दुपारनंतर तुमचा उत्साह वाढेल. कामे मार्गी लागतील. कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभेल. वाहने सावकाश व जपून चालवावीत. आरोग्याच्या तक्रारी कमी होणार आहेत.

मिथुन : दुपारनंतर काहींचा वेळ अनावश्यक कामात वाया जाणार आहे. प्रवास नकोत. महत्त्वाची कामे तसेच दैनंदिन कामे शक्यतो दुपारपूर्वी करावीत. दुपारनंतर अनावश्यक खर्च होणार आहेत.

कर्क : आरोग्य उत्तम राहणार आहे. काहींचा बौद्धिक प्रभाव राहील. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. तुम्ही आपली मते इतरांना पटवून देणार आहात. आरोग्य उत्तम राहणार आहे.

सिंह : तुम्ही आपली कामे पूर्ण करणार आहात. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. प्रवास सुखकर होणार आहेत. मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील. आत्म विश्वास वाढेल. मनोबल उत्तम राहील.

कन्या : आर्थिक कामाचा ताण कमी होईल. दुपारनंतर काहींना अनपेक्षित पणे नातेवाईक भेटतील. प्रवासाचे योग संभवतात. चिकाटीने कार्यरत रहाल. तुमचा आत्मविश्वास वाढणार आहे.

तुला : दुपारनंतर अनपेक्षितपणे धनलाभ होईल. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. सुसंवाद साधाल. प्रवास सुखकर होणार आहेत. मनोबल वाढेल. आर्थिक कामात सुयश लाभणार आहे.

वृश्चिक : दुपारनंतर तुमचा उत्साह व उमेद वाढणार आहे. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. मनोबल चांगले ठेवावे. प्रवास सुखकर होणार आहेत. मानसिक प्रसन्नता लाभणार आहे.

धनु : आज काहींची चिडचिड होणार आहे. दुपारनंतर एखाद्या मनस्तापदायक घटनेला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. दुपारनंतर तुमची कामे रखडण्याची शक्यता आहे.

मकर : आजचा दिवस आपणाला अनेक बाबतीत अनुकूल जाणार आहे. तुमचा प्रभाव वाढेल. मनोबल उत्तम राहील. महत्वाची कामे होतील. दुपारनंतर काहींना अचानक धनलाभाची शक्यता आहे.

कुंभ : तुम्ही अधिक जबाबदारीने वागणार आहात. मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्नशील रहावे. मानसिक स्वास्थ्य जपावे. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमची अपेक्षित प्रगती होईल.

मीन : दुपारनंतर काहींचा उत्साह वाढेल. प्रवास होणार आहेत. कामाचा ताण कमी होईल.आरोग्याच्या तक्रारी कमी होणार आहेत. दुपारनंतर तुम्हाला मानसिक प्रसन्नता देणारी एखादी घटना घडेल.

# राज्यातील जनतेला सुख समृद्धी प्राप्त होउ दे : आ. बाळासाहेब पाटील



श्री गणेशाची प्रतिष्ठापणा करताना आ. बाळासाहेब पाटील समवेत सागर पाटील, सौरभ पाटील, जशराज पाटील व इतर

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री आमदार बाळासाहेब पाटील यांनी मंगळवार पेठ, कराड येथील निवासस्थानी कुटुंबियांसमवेत श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली व राज्यातील जनतेला सुख समृद्धी प्राप्त होउ दे अशी श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना केली. याप्रसंगी प्रकाश पाटील (बापू), जशराज पाटील (बाबा), सागर पाटील (दादा), सौरभ पाटील (तात्या), दिग्विजय पाटील, पार्थेश पाटील, वल्लभ पाटील, ध्रुवतेज पाटील, कु.गार्गी पाटील, कु.नारायणी पाटील, कु. रुद्रायणी पाटील उपस्थित होते. यावेळी आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले, आज राज्यामध्ये श्री गणेशाचे आगमन होत आहे, गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय, योगायोगाने महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस पडलेला आहे, काही ठिकाणी नुकसान झालेले आहे, परंतू भविष्यामध्ये शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. आणि या उत्साहाच्या वातावरणात श्री गणेशाचे आगमन होत आहे, आणि गणेशोत्सवाचे दहा दिवस उत्साहात व शांततेत साजरे करावे असे सांगून राज्यातील जनतेला श्री गणेश चतुर्थी व गणेशोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# माझी शाळा आदर्श शाळा कार्यशाळा उद्घाटन समारंभात जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा विरकरवाडी शाळेचा बोलबाला



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**म्हसवड :** सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या माझी शाळा आदर्श शाळा कार्यशाळा उद्घाटन समारंभात जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा विरकरवाडी शाळेचा बोलबाला झाला.

दुष्काळी माण तालुक्यातील मॉडेल स्कूल म्हणून पूर्णत्वास आल्याने नुकताच जिल्हा परिषद आदर्श शाळा विरकरवाडीचा मा. नामदार सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. शंभूराज देसाई साहेब तसेच महाराष्ट्र कृष्णा खोरे उपाध्यक्ष मा. नामदार श्री महेश शिंदे साहेब तसेच सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री जितेंद्र डुडी साहेब ,जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख, तसेच सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराजन मॅडम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री निलेश घुले साहेब व उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे मॅडम तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक शबनम मुजावर मॅडम तसेच शिक्षण विभाग योजनेचे प्रमुख अनिस नायकवडी साहेब यांच्या उपस्थितीमध्ये विरकरवाडी आदर्श शाळेची चित्रफीत दाखवून विविध उपक्रमांचे कौतुक करून गुणगौरव करण्यात आला.

सदर कार्यशाळेमध्ये सातारा जिल्ह्यातील २२३ शाळेतील सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक ग्रामसेवक, सर्व अभियंता तसेच शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या आदर्श प्राथमिक शाळा विरकरवाडीच्या इमारत बांधकाममध्ये, अद्यायवत फरशी, स्लाइडिंग विंडो, दरवाजे, सुसज्ज संगणक कक्ष, विज्ञान कक्ष,स्पोर्ट रूम, वाचनालय, हॅन्ड वॉश स्टेशन, पाण्याची टाकी, गांडूळ खत निर्मिती, परसबाग, जीवामृत, बालोद्यान, शासकीय योजनांचे फलक, शाळेच्या पूर्ण परिसराचा नकाशा, पेविंग ब्लॉक, सुसज्ज प्रवेशद्वार, स्वागत कमान व अद्यायवत मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह या सर्व उपक्रमांची जिल्हा परिषदेच्या वतीने उपस्थित प्रेक्षागृहात चित्रफीत दाखवण्यात आली.

त्यामध्ये आदर्श शाळेच्या विविध भौतिक घटकाबद्दल तसेच शैक्षणिक गुणवत्ता व लोकसहभाग याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी जिल्ह्यातील सर्वांना एकत्रित येऊन सर्वांच्या सहकार्यातून सर्व आदर्श शाळेतील बांधकामे भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता व लोकसहभागातून करावयाची कामे एप्रिल अखेर पूर्ण करण्यात यावी असे प्रास्ताविकात सांगितले. तसेच जिल्हाधिकारी डुडी साहेब यांनी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, शिक्षक या सर्वांनी एकत्रित येऊन शाळेच्या विकासासाठी भरीव योगदान द्यावे असे आवाहन केले.मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद आदर्श शाळा विरकरवाडी यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन व शिक्षणाधिकारी प्राथमिक जि. प.सातारा शबनम मुजावर मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी माण तालुक्यातून माण तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री लक्ष्मण पिसे, केंद्रप्रमुख दिपक पतंगे, विरकरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विशाल विरकर, उपाध्यक्ष बालराजे विरकर, विरकरवाडी शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. सुशील त्रिगुणे, मुख्याध्यापक अनिता तोरणे, सोसायटीचे चेअरमन भिवाजी खोत, माजी नगरसेवक सोपान विरकर, माजी केंद्रप्रमुख जगन्नाथ विरकर साहेब,राधेश विरकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सारिका विरकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आदर्श शाळेच्या वतीने विविध गुणवत्तेबरोबर क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरावर खेळाडू घडवणे तसेच कलाक्षेत्रात विविध व्यक्तिमत्व विकास स्पर्धा यांचा शालेय गुणवत्तेमध्ये सहभाग असून विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी आदर्श शाळेची वाटचाल सुरू आहे.

# स्व. सचिन शिंदे यांच्या स्मरणार्थ १०२ रक्तदात्यांनी केले रक्तदान!

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**औंध :** औंधचे माजी उपसरपंच स्व. सचिन शिंदे यांच्या स्मरणार्थ व गणेशोत्सवाचे औचित्य साधून शुभम शिंदे मित्र समूहाच्या वतीने औंध येथे आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उदघाटन औंध पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चिमणाजी केंद्रे,औंध शिक्षण मंडळाचे विश्वस्त हणमंतराव शिंदे,राजयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमर देशमूख,गणेश देशमूख,आदेश माने,संजय भोसले, तानाजी इंगळे, रमेश यादव,अनिल माने, शुभम शिंदे,सुखदेव इंगळे,निळूभाऊ कांबळे, राजेंद्र कुंभार, श्रीपाद सुतार,आदीसह यमाई मित्र मंडळाचे सभासद व आयुष ब्लड बँक कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी बोलताना हणमंतराव शिंदे म्हणाले की, रक्तदान हे जीवनदान असून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. स्व. सचिन शिंदे यांच्या यांच्या स्मरणार्थ व गणेशोत्सवाचे औचित्य साधून शुभम शिंदे मित्र समूहाने आयोजित केलेला हा कार्यक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. औंधला असणारा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक वारसा जपण्याचे काम नवीन पिढी करत आहे. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन श्रीपाद सुतार यांनी केले तर आभार शुभम शिंदे यांनी मानले.

# कृष्णा नर्सिंगमध्ये आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** येथील कृष्णा विश्व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेसमध्ये आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. पुणे येथील सुप्रसिद्ध आदित्य बिर्ला हॉस्पिटलमध्ये स्टाफ नर्स पदाच्या भरतीसाठी या कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी आदित्य बिर्ला हॉस्पिटलच्या नर्सिंग डायरेक्टर मिनी नायर, वरिष्ठ मनुष्यबळ अधिकारी सुमित मुखर्जी, नर्स एज्युकेटर लिनाक्षी के., अभिषेक चव्हाण प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी कृष्णा नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली मोहिते यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी नर्सिंग पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींची स्टाफ नर्स पदासाठी लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात आली.

याप्रसंगी बोलताना कृष्णा नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली मोहिते म्हणाल्या, की सहकारमहर्षी जयवंतराव भोसले (आप्पा) यांनी १९८३ साली कृष्णा नर्सिंग महाविद्यालयाची स्थापना केली. आप्पासाहेबांनी लावलेल्या या रोपट्याचा आज कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वटवृक्ष झाला आहे. सद्य:स्थितीत कृष्णा नर्सिंग इन्स्टिटयूटमध्ये जी.एन.एम. नर्सिंग, बी.एससी. नर्सिंग, पोस्ट बी.एससी. नर्सिंग, नर्स प्रॅक्टिशनर इन क्रिटीकल केअर, एम.एससी. नर्सिंगसह पी.एचडी. अभ्यासक्रमासाठी अनेक विद्यार्थी प्रवेश घेतात. विशेषत: ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना या संस्थेमुळे नर्सिंग शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे. या संस्थेत शिक्षण घेतलेले दोन हजारहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थीनी ब्रिटन, आखाती देशांसह देशविदेशात चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. आदित्य बिर्ला हॉस्पिटलने नर्सिंग स्टाफच्या भरतीसाठी कृष्णा नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देऊन, या महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रशंसा केली आहे.

याप्रसंगी प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. मंदार माळवदे, सहसमन्वयक तेजस भोसले, आफसाना मुल्ला यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृष्णा कारखान्यावर श्रींची प्रतिष्ठापना

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर श्री गणेशाचे आगमन मोठ्या आनंदात आणि उत्साहात झाले. चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली.



श्री गणरायाच्या मूर्तीची विधिवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी संचालक जितेंद्र पाटील,संजय पाटील, बाबासो शिंदे, शिवाजी पाटील, अविनाश खरात, कार्यकारी संचालक महावीर घोडके, मनोज पाटील, एम.के कापुरकर, बाळासाहेब पाटील, वसंतराव पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी फायनान्स मॅनेजर राजाराम चन्ने, ऊसविकास अधिकारी पंकज पाटील, शुगर गोडावून किपर किशोर देशमुख, इलेक्ट्रिक इंजिनिअर डी टी पाटील, संरक्षण अधिकारी संजय नलवडे, ज्युनिअर सिव्हिल इंजिनिअर संदीप पाटील यांच्यासह युनियन व गणेश मंडळाचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

श्री गणेशोत्सवाच्या काळात विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहे. या कालावधीमध्ये सोमवार दि. ०९ सप्टेंबर रोजी व्याख्याते युवराज पाटील (कोल्हापूर) यांचे मचला कुटुंब जाणूया या विषयावर व्याख्यान, मंगळवारी दि. १० सप्टेंबर रोजी व्याख्याते पानिपतकार विश्वास पाटील यांचे मछ. शिवरायांचे धगधगते जीवनफ या विषयावर व्याख्यान, बुधवार दि. ११ सप्टेंबर रोजी व्याख्याते जयवंत आवटे यांचे कथाकथन कारखाना सभागृहामध्ये आयोजित केले आहे. ही सर्व व्याख्याने दुपारी ३ वाजता होणार आहेत. याचा लाभ गणेश भक्तांनी घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# रयत शिक्षण संस्थेचे मेरू विद्यामंदिर वाघेश्वर या ठिकाणी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न

ग्रामोध्दार वृत्तसेवा

भणंग : रयत शिक्षण संस्थेचे मेरू विद्यामंदिर वाघेश्वर या ठिकाणी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी विद्यालयातील मा. मुख्याध्यापक श्री. जाधव बी. डी यांच्या प्रेरणेतून ही कार्यशाळा संपन्न झली. कला शिक्षिका सौ. वलेकर एस. पी यांनी विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती बनविण्याचे प्रत्यक्षिक करून दाखविले व मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, सर्वांनी मल्हार, मोरावर स्वार, सिंहासनवर् बसलेली, बालगणेश अशा विविध रूपात मूर्ती बनविल्या. विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यशाळेतील मूर्ती पाहून ग्रामस्थ, शाळा समिती, व्यवस्थापन समिती, व्यवस्थापन व विकास समिती, माता पालक संघ, पालक शिक्षक संघ यांनी कलाविष्कारचे कौतुक केले.






**मेढा नगरपंचायत, मेढा**

**ता.जावली जि.सातारा**

**फोन – ०२३७८ ऑफिस–२८५२१६**

E-mail id- nagarpanchayatmedhagmail.com स्थापना २४/०५/२०१६

**संक्षिप्त ई–निविदा प्रसिद्धीकरण सूचना**

मेढा नगरपंचायत कोंडवाडा जागेवरील इमारतीमध्ये फर्निचर बसविणे व पोपटवाडी येथे गटर बांधणे या कामांची ई–निविदा Main portal https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०९/०९/२०२४ पासून प्रसिद्ध करण्यात आले आहे. सर्व पात्र / इच्छुक निविदा धारकांनी निविदा पत्र डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी याच https://mahatenders.gov.in या साईट वर enrolled करणे आवश्यक आहे.

**ई–निविदा प्रसिद्धी दिनांक ०९/०९/२०२४**
**ई–निविदा भरणेची प्रारंभ दि.०९/०९/२०२४**
**ई–निविदा भरणेची अंतिम दि. १७/०९/२०२४**
**ई–निविदा उघडणेची दिनांक १८/०९/२०२४ शक्य झाल्यास**

**मेढा न.पं.जा.क्र./बा.वि./ १५८/२०२४/२५**
**दिनाक: ०६/०९/२०२४**

**सहि/–**
**(पराग कोडगुले)**
**मुख्याधिकारी, मेढा नगरपंचायत, मेढा**

# वेशीबाहेरील मुलांची शाळा

**गेल्या दशकभरात उमेदच्या कामाचा पसारा वाढत तिथे सध्या साधारण ७० मुले आपल्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहत राहत आहेत.**

देशातील प्रमुख प्रगतशील राज्य अशी आपल्या महाराष्ट्राची ओळख प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा सांगणारा, विवेकाची कास धरल्याचा अभिमान बाळगणारा हा प्रदेश तरीही वेशीबाहेरील वस्तीचे दु:ख पूर्णपणे दूर करण्यात यश मिळाले नाही. मात्र, त्या ध्येयाच्या दिशेने अविरत चालणारी पावले आपल्याला दिसतात. वैयक्तिक, भौतिक सुखाचा विचार न करता वंचित समूहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचा हरपलेला सन्मान परत मिळवून देण्यासाठी काम करणारे हजारो हात राज्यभर विखुरलेले पाहायला मिळतात. वर्धा जिल्ह्यातील रोठा या गावातील उमेद ही संस्थाही त्याच साखळीतील मोलाचा दुवा आहे.

टिश काळापासून गुन्हेगारी जमात हा कलंक अंगावर बसलेल्या व आजही त्याचे चटके झेलणाऱ्या पारधी समाजाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी अद्याप वक्रच आहे. कधीच कायमचा पत्ता नसलेली व हल्ली मुक्काम कुठे, हेही सांगता न येणाऱ्या या समाजाचे वंचितपण अजूनही कायम आहे. येणाऱ्या प्रत्येक पिढीने परंपरागत कामेच करावी, या मानसिकतेच्या दृष्टचक्रात अडकलेला हा समाज पोटच्या मुलाबाळांना भीक मागण्यासाठी अजूनही पिटाळतो. हे चित्र पाहून मन विदीर्ण झालेल्या मंगेशी मून यांनी त्यामध्ये बदल घडवण्याचा संकल्प सोडला. मंगेशी यांच्या वडिलांनी त्यांना वर्ध्याजवळ रोठा या गावी शेतजमीन दिली होती. त्याचा उपयोग वैयक्तिक लाभासाठी करून घेण्याऐवजी मून यांनी त्यावर उमेद प्रकल्पाचा पाया रचला. पारधी समुदायातील तसेच अन्य काही वंचित समूहातील मुलांसाठी हा प्रकल्प २०१४-१५पासून भविष्यासाठी आशेचा किरण ठरला आहे.

हा प्रकल्प वर्ध्यामध्ये उभारण्यात आला असला तरी त्याची सुरुवात मुंबईत झाली. लोकलने प्रवास करताना मंगेशी मून यांना फलाटाच्या आजूबाजूला पारधी कुटुंबे दिसायची. या कुटुंबांमधील मुले भीक मागण्याच्या नादात गाडीखाली आली, काही अपंग झाली. अशा वेळी पोटातील भुकेची आग माणुसकीचा कसा बळी घेते हे मून यांना दिसले. आपली मुले अपंग झाली याबद्दल त्यांच्या आईवडिलांना फार दु:ख नसायचे. अपंग मुलांना जास्त भीक मिळेल ही भावना अधिक प्रबळ असायची.

मून यांनी रस्त्यावरील सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांशी संवाद वाढवला. त्यातून त्यांना मिळालेली माहिती त्रासदायक होती. भीक मागण्यासाठीच मुलांना जन्म द्यायचा. स्वत:ला मूल नसेल तर दुसऱ्याची मुलं भाड्याने घ्यायची. भिकेचे हिस्से करायचे. मुलांनी भीक मागून मिळवलेला पैसा दारू, जुगार यामध्ये घालवायचा. भांडण-तंटेही नेहमीचेच. हे सर्व प्रकार लक्षात आल्यावर मंगेशी मून यांनी मुंबईत भीक मागणाऱ्या मुलांचा ठिकठिकाणी शोध घेतला. यापैकी काही मुले वर्ध्याजवळ पारधी बेड्यावरील असल्याचे त्यांना समजले. भीक मागण्यासाठी ही वंचित कुटुंबे महानगरात स्थलांतर करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर या मुलांचा शोध घेण्याचे काम सुरू झाले. मुंबईत लोकलमध्ये, आझादनगर, बँडस्टँड अशा ठिकाणी भीक मागणाऱ्या मुलांचा शोध घेतला. सानपाडा पुलाखालून १८ मुलांना त्या रोठा येथे घेऊन आल्या. त्यांच्या पुनर्वसनासाठी उमेद एज्युकेशनल ट्रस्ट स्थापन केला. गेल्या दशकभरात उमेदच्या कामाचा पसारा वाढत तिथे सध्या साधारण ७० मुले आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत राहत आहेत.

या मुलांना रोठा येथे आणल्यानंतर त्यांच्या राहण्याची सोय झाली. पण मुलांसाठी कपडेलत्ते आणि जेवणाचा प्रश्न मुख्य होता. त्यासाठी मून यांनी अनेकांकडे मदत मागितली. दान देण्याचे आवाहन समाजमाध्यमांवर केले. त्याला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला. मात्र केवळ यावर अवलंबून राहणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी स्वत:च्या शेतात धान्य पिकवायला सुरुवात केली. त्यातून थोडाफार पैसा मिळाला आणि जेवणाची भ्रांत मिटली. यापुढचा टप्पा अधिक परीक्षा पाहणारा होता.


या मुलांना शाळेत दाखला मिळावा या हेतूने मून त्यांना घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्या. पण मुलांच्या नावाचा एकही शासकीय किंवा कौटुंबिक चिटोराही नव्हता. त्यामुळे त्यांना शाळेत दाखल कसे करायचे असे म्हणत शाळेकडून त्यांना परतवून लावण्यात आले. यानंतर शिक्षणाधिकारी कार्यालयाची मदत मिळाल्याने मुलांना एका खासगी शाळेत प्रवेश मिळाला. मात्र, ही मुले घाणेरडी, चोऱ्या करणाऱ्या कुटुंबातील आणि भांडकुदळ आहेत असे आरोप सुरू झाले. गावातील पालकांनी तक्रारी केल्या. परत शासकीय हस्तक्षेप झाला. मात्र, नंतर चोरीचा ठपका ठेवून मुलांना शाळेतून काढण्यात आले. त्याची चौकशी झाल्यावर दोन शिक्षकांना निलंबित करण्यात आले. अखेर, मंगेशी यांच्या मदतीला मग राष्ट्रसंत तुकडोजी विचार प्रतिष्ठान मानस मंदिर शाळेचे व्यवस्थापन धावून आले. याच शाळेत आता प्रकल्पातील मुले शिकतात.

मुले शाळेत जायला लागून चार-सहा महिने होत नाहीत तोच काही मुलांचे पालक प्रकल्पावर धावून आले. मुले परत द्या म्हणून त्यांनी गलका केला. प्रकल्पाच्या दारावरच आमची मुले परत द्या म्हणून आरडाओरडा व्हायचा. प्रसंगी प्रकल्पावर दगडफेक केली जात असे. मुले शिकली तर भीक कोण मागणार असा त्यांच्या पालकांचा सवाल असे. काही पालक आपल्या मुलांना परत घेऊन गेल्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडत असे. प्रकल्पातील चंद्रमुखी आणि मुस्कान या दोन मुलींचे उदाहरण बोलके आहे. या मुली भीक मागून आपल्या कुटुंबाला पोसायच्या. त्या उमेद येथे येऊन शिकू लागल्या. मात्र त्यांच्या आईवडिलांनी भांडण करून त्यांना परत नेले. त्यांना कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये फुगे विकण्यासाठी पाठविले जात असे. त्या आलेली कमाई आईच्या हातात देत. मात्र तो पैसा दारू पिण्यात उडवला जाई. भांडण आणि मारहाण याला कंटाळून दोघी जणी परत प्रकल्पावर पळून आल्या, पण त्यांचे आईवडील पुन्हा त्यांना घेऊन गेले. त्यामध्ये त्यांच्या शिक्षणात दोन वर्षांचा खंड पडला. शेवटी दोघी जणी त्यांच्या आजीच्या मदतीने परत आल्या. गेल्या वर्षीच दोघी जणी चांगल्या गुणांनी दहावी उत्तीर्ण झाल्या आहेत. आता त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. काहीतरी करून दाखवायचे अशी जिद्द आहे. आईवडिलांकडे परत जाण्यास त्यांनी नकार दिला आहे. येथेच राहून त्या कला, कौशल्ये शिकत आहेत. दोघींना पुढील शिक्षणासाठी पुण्यात ठेवणार असल्याचे मून यांनी सांगितले.

आपले मूल परत न्यायचेच असा हट्ट धरणाऱ्या काही पालकांनी वर्धा पोलिसांकडे धाव घेतली होती. पोलिसांनी त्यांची समजूत घालून परत पाठविले. त्यानंतर पालकांनी अमरावती पोलिसांकडे धाव घेतली. मॅडम आमच्या मुली परत देत नाहीत, अशी तक्रार केली. पोलिसांनी मून यांना मुलांना परत करण्याचे निर्देश दिले. तेव्हा मुलींना परत पाठवते पण त्यांची जबाबदारी अमरावती पोलिसांनी घ्यावी, तसे लेखी लिहून द्यावे असे म्हटल्यावर पोलिसांनी हात झटकल्याचे मून सांगतात. यानंतर, आईवडिलांनी जात पंचायत, समाज प्रमुख, इत्यादींचा दबाव आणण्याचा प्रयत्न केला. शेवटी मून यांच्या परोक्ष पालक मुलांना बळजबरीने घेऊन गेले. या सर्व संघर्षाला तोंड देत उमेदचे काम सुरू आहे.

मुलांबरोबर आनंदाचे क्षण घालविण्यासाठी वर्धा शहरातील अनेक कुटुंबे प्रकल्पावर वाढदिवस साजरे करतात. त्यांना मदत देतात. त्यापूर्वी मुलांना स्वावलंबनाचा पहिला धडा श्रमदानातून मिळतो. मंगेशी मून यांच्या आईचा मुलांना आजी म्हणून लळा लागला आहे. मून यांच्या परिवारातील सर्वच सदस्य पालक म्हणून मुलांची काळजी घेतात. पण पुढे काय, हा प्रश्न आ वासून उभा आहे. मुलांची संख्या वाढत असल्याने खर्चही वाढत आहे. या कोवळ्या कळ्यांमाजी, लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी ही राष्ट्रसंतांची उक्ती मंगेशी मून यांना सार्थ ठरवायची आहे. प्रत्येक मुलाचे भविष्य मोठे करायचे आहे.

# सर्व विघ्ने दूर व्हावीत...



अलीकडच्या काही घटना समाजमन ढवळून काढणाऱ्या होत्या. तो दाह अजूनही जाणवतो आहे. गौरी, गणपती, नवरात्री आदी उत्सव धुमधडाक्यात साजरा करणाऱ्या या समाजातील वाढती विकृती अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करून टाकत आहे. त्याविरुद्धचा जागर, लढा एक-दोन दिवस मेणबत्त्या पेटवून संपणार नाही. सणांच्या निमित्ताने अशा शक्तीविरुद्ध एकवटण्याचे प्रयत्न करता येतील. थोडक्यात, हा उत्सव साऱ्यांसाठी आनंददायी आणि समाधान देणारा असावा, या दृष्टीने आता प्रयत्न होण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. सर्व विघ्ने दूर व्हावीत, गणेशोत्सवाचा हाच तर खरा उद्देश आहे. लोकांनी स्वत: आनंद घ्यावा, इतरांना द्यावा, हेच विघ्नहर्त्याचेही म्हणणे असावे.

आज विघ्नहर्त्याचे आगमन झाले आहे.एकीकडे त्याच्या स्वागताची तयारी सुरू असताना दुसरीकडे या उत्सवकाळात सामाजिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी काय करता येईल, याचाही विचार व्हायला हवा. सध्या हा देखील सणाच्या साजरीकरणाचा एक भाग असण्याची गरज आहे. ते साधले तर नानाविध सामाजिक प्रश्नांचे तिढे वाढत असताना समाजाला एकत्रित करणाऱ्या या वातावरणाचा यशोचित परिणाम बघायला मिळेल.

घरोघरी उत्सवाच्या महापर्वाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत आहे. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती, परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच, खेरीज काळानुरूप त्यात आवश्यक ते विचारप्रवाह प्रभावी आणि परिणामकारक करण्याचे कामही आपसूकच होत असते. त्यामुळेच वरकरणी या गोष्टी सालाबादप्रमाणे येणाऱ्या, नैमित्तिक वाटत असल्या तरी प्रत्येक वर्षीचा सण वेगळा असतो आणि तो काही तरी नवीन वैचारिक ठेवा देऊन जात असतो. नवीन पिढीचे संस्करण हा त्यातील एक भाग आहेच, त्याचबरोबर सामाजिक प्रश्नांप्रती सार्वत्रिक समज वाढवण्याचे हे एक अतिशय प्रभावी माध्यमही आहे. हे जाणूनच लोकमान्यांनी इंग्रजी जुलूम आणि गुलामगिरीविरोधात जनमत संघटित करण्यासाठी गणेशोत्सव सार्वत्रिक केला. या प्रयत्नाने एका जनलढ्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आपण पाहिली. आज आपण स्वतंत्र आहोत. जगामध्ये एक ओळख राखून आहोत. आता तर जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरू आहे. मात्र समाजभावना जाज्वल्य ठेवण्यासाठी, चुकीच्या पायंड्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, अयोग्य गोष्टींविरोधात एकत्रितपणे उभे राहण्यासाठी आजही सण-उत्सवांचे महत्त्व पूर्वीइतकेच आहे, हे विसरता कामा नये. सण आणि सामाजिक जाणिवा हे समीकरण प्रत्येक साजरीकरणावेळी स्मरणात राहायलाच हवे. यंदाच्या येऊ घातलेल्या गणेशोत्सव आणि अन्य सणश्रृंखलेच्या निमित्ताने हे विसरता कामा नये.

तसे पाहायला गेल्यास आज प्रत्येक दिवस सणासारखा साजरा करण्याची नवप्रथा एका वर्गामध्ये बघायला मिळते आहे. ङ्गआहे रेफवर्गाचा प्रत्येक वीकएंड या सदरात मोडू शकतो. मात्र वैयक्तिक सुखे आणि एकत्र येऊन अनुभवण्याजोगी सुखे आणि त्यातून वृद्धिंगत होणाऱ्या सामाजिक जाणिवा हे दोन पूर्णपणे भिन्न पण लक्षात घेण्याजोगे विषय आहेत. म्हणूनच यंदाच्या उत्सवाची तयारी करताना निखळ आनंद मिळवण्याबरोबर हा सामाजिक आशय आणि पदरही ध्यानी ठेवायला हवा. विशेषत: आजचे आपले पारतंत्र्य, दास्य, एकटेपण, प्रश्न, समस्या, सामंजस्य वेगवेगळ्या पातळीवर उग्र रूप धारण करत असताना, या प्रश्नांचे स्वरूप बदलत असताना परिस्थितीला तोंड फोडण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी, मंथन करण्यासाठी समाज एकत्रित आणणाऱ्या या सणांसारखे दुसरे एखादे योग्य व्यासपीठ आहे, असे वाटत नाही. म्हणूनच गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरूपाचाही विचार करायला हवा. गणेशोत्सवातून कलागुणांना वाव मिळावा, नेतृत्वगुण जोपासले जावे हा विचार काही आजचा नाही. तो फार पूर्वीपासूनचा आहे. अलीकडे नेतृत्वाची संधी म्हणूनही या उत्सवाकडे पाहिले जात आहे. मात्र सध्या गणेशोत्सवामध्ये सामाजिक संस्था, संघटनांच्या सहभागाऐवजी राजकीय पक्ष, नेते आणि कार्यकर्त्यांचा सहभाग वाढत आहे. आपल्या प्रसिद्धीची, जनतेपर्यंत जाण्याची आयती संधी म्हणून या उत्सवाकडे पाहिले जात आहे. आता विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने हा उत्सव अधिक धामधुमीत साजरा करण्यावर भर दिला जाणार हेही उघड आहे. गणेशोत्सव मंडळे असोत वा नेते मंडळी असोत, दोन्हींकडेही संधी साधणे हा समान गुण दिसून येतो, तो आताही दिसेलच.

काही वर्षांपूर्वी एक गाव, एक गणपती ही संकल्पना राबवण्यावर भर देण्यात आला होता; परंतु ती म्हणावी तशी अस्तित्वात येऊ शकली नाही. याचे प्रमुख कारण नेतृत्वासाठी सुरू असणारी स्पर्धा हेच आहे. आज शहरांमध्ये वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जागोजागी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक तसेच सामान्य जनता हैराण आहे. अशा परिस्थितीत रस्त्यात रहदारीला अडथळा येईल, अशा पद्धतीने उभारण्यात आलेले गणेशोत्सवाचे मंडप भर घालतात. अशा मंडपांमुळे वाहतुकीच्या कोंडीत भर पडून जनतेला काय त्रास सहन करावा लागतो याची कल्पनाच केलेली बरी. याचा विचार करता हा उत्सव रस्त्यांवर साजरा होणार नाही, यासाठी प्रयत्न गरजेचे आहे; परंतु ते करायचे कोणी आणि त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळणार का, हाही प्रश्नच आहे. कारण या काळात कायदा आणि सुव्यवस्था मोडीत आणण्याचाच चंग अनेक कार्यकर्त्यांनी बांधल्याचे दिसते. त्यामुळे स्पीकर्सचा आवाज, मिरवणुकांच्या वेळा, कार्यक्रमांच्या वेळा याबाबतचे कोणतेही नियम किंवा त्या संदर्भातील पोलिसांच्या, न्यायालयांच्या सूचनांचा विचार केला जात नाही. अशा पद्धतीने जनतेला त्रास देऊ शकणारे विघ्न आणून विघ्नहर्त्याचा उत्सव साजरा करणे कितपत योग्य ठरते याचा विचार व्हायला हवा.

गणेशोत्सव काळात वर्गणी जमा करणे काही ठिकाणी जणू खंडणी जमा करण्याचाच प्रकार ठरतो. वास्तविक, वर्गणी ऐच्छिक असावी. ती देणाऱ्याला मनापासून समाधान वाटावे; तरच त्या उत्सवाला काही अर्थ राहतो; परंतु हेही समजून कोण घेणार? कारण गणेशोत्सवात अधिकाधिक खर्च करण्याबाबतही विविध मंडळांमध्ये स्पर्धा पाहायला मिळते. यंदा हेही चित्र बदलले तर बरे होईल. तसे झाल्यास जनतेचा या उत्सवातील सहभाग वाढेल आणि हा खऱ्या अर्थाने लोकोत्सव ठरेल. अलीकडे सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशमूर्तीही अधिकाधिक उंचीच्या, भव्य असतील यावर भर दिला जात आहे. मूर्ती अधिक उंचीची असेल तरच गणेशोत्सवाला अर्थ आहे असाच जणू समज आढळतो; परंतु अशा मूर्तींसंदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. मिरवणुकीपासून विसर्जनापर्यंत अनेक प्रकारचा त्रास समोर येतो. त्यामुळे गणेशमूर्तींचा आकार आटोपशीर असेल याकडे सर्वच गणेश मंडळांनी लक्ष देण्याची गरज आहे.

कोणताही धार्मिक उत्सव हा त्याच भावनेने आणि श्रद्धेने साजरा व्हायला हवा; परंतु गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत दारू पिऊन नाचणाऱ्यांचा धार्मिक भावनांशी आणि श्रद्धेशी काय संबंध, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. त्यामुळे या उत्सवामध्ये धार्मिक भावना जोपासली जावी, तो श्रद्धेने साजरा करावा, यासाठी नव्याने प्रबोधनाची आवश्यकता आहे. अर्थात या साऱ्या परिस्थितीतही काही आशेचे किरण आहेत. काही मंडळे कोणताही डामडौल न करता साधेपणाने; परंतु श्रद्धेने गणेशोत्सव साजरा करत आहेत. गणेशोत्सव काळात विविध सामाजिक उपक्रमांमधून समाजाविषयीची जाणीव प्रकट होत आहे; परंतु अशी मोजकीच उदाहरणे पाहायला मिळत आहेत. अशा मंडळांची संख्या वाढणे किंवा इतरांनी त्यांचे अनुकरण करण्याची खरी आवश्यकता आहे. शेवटी संपूर्ण समाज एकत्र यावा, त्यात एकसंधता राहावी यासाठी सांस्कृतिक धाग्याचा वापर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात झाली, याचे स्मरण आपण ठेवायला हवे.


हल्ली गणेशोत्सवामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर व्याख्याने या बाबी अभावानेच पाहायला मिळत आहेत. त्याऐवजी डॉल्बीचा वापर वाढत आहे; परंतु जोरजोरात वाजणाऱ्या आणि कानाचे पडदे दुखावू शकणाऱ्या डॉल्बीच्या गंभीर दुष्परिणामांचा विचार व्हायला हवा. खरे तर डॉल्बीऐवजी कमी आवाजातील स्पीकर, त्यावर वाजणारे सनईचे सूर तसेच भक्तिगीते वा भावगीते यातून गणेशोत्सवाचा खरा आनंद प्राप्त होणार आहे. पूर्वी गणेशोत्सव काळात मेळे व्हायचे. त्यामध्ये वेगवेगळे कार्यक्रम होत, त्यातून उपजत कला-गुणांना वाव मिळायचा. आताही ती संधी मिळवून देणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने समाज एकत्रित येत असल्याने सामाजिक स्वास्थ्य, सलोखा, बंधुता आदी हरपत चाललेली गुणवैशिष्ट्ये वाढवण्यासाठी त्याचा वापर करून घेण्याबाबत विचार होणे गरजेचे आहे. अलीकडच्या काही घटना समाजमन ढवळून काढणाऱ्या होत्या. तो दाह अजूनही जाणवतो आहे. गौरी, गणपती, नवरात्री आदी उत्सव धुमधडाक्यात साजरा करणाऱ्या या समाजातील वाढती विकृती अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करून टाकत आहे. त्याविरुद्धचा जागर, लढा एक-दोन दिवस मेणबत्त्या पेटवून संपणार नाही. सणांच्या निमित्ताने अशा शक्तीविरुद्ध एकवटण्याचे प्रयत्न करता येतील. थोडक्यात, हा उत्सव साऱ्यांसाठी आनंददायी आणि समाधान देणारा असावा, या दृष्टीने आता प्रयत्न होण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. गणेशोत्सवाचा हाच तर खरा उद्देश आहे. लोकांनी स्वत: आनंद घ्यावा, इतरांना द्यावा, हेच विघ्नहर्त्याचेही म्हणणे असावे.

तेव्हा त्याच्या उपासकांनी, भक्तांनी, साधकांनी या विचारातून यंदाच्या उत्सवात रंग भरावेत आणि आपल्यावरीलच नव्हे तर त्याच्या साक्षीने संपूर्ण समाजावर येऊ घातलेल्या विघ्नांचा नाश करावा, हे उत्तम.

# भगवंताचा विसर हेच मोठे पाप !

खरोखर, भगवंताचे अस्तित्व जिथे पाहावे तिथे आहे. भगवंत आहे की नाही हे जाणण्याकरिताच बुद्धीची देणगी आपल्याला मिळाली आहे. भगवंताचे मर्म ओळखायला, मी कसे वागावे हे पाहावे. ज्यांनी भगवंताला जाणले, त्यांनी भगवंताला काय आवडते हे सांगून टाकले आहे. ङ्ग सर्व विषयवासना सोडून भगवंताला शरण जावे म हे त्यांच्या सांगण्याचे सार आहे. हे आप्तवाक्य आपण प्रमाण मानले पाहिजे; कारण स्वत: अनुभव घेऊन, म्हणजेच स्वत: मुक्त होऊन, त्यांनी आपल्याला मुक्तीचा मार्ग दाखविला. जन्ममरणापासून जो आपल्याला मुक्त करतो तो खरा आप्त. जे भगवंताचे होऊन राहिले त्यांना जगाची भीती नाही वाटत. आपण विषयांना नेहमी शरण जातोच की नाही ? मग भगवंताला शरण जायला का भ्यावे ? खरोखर, सर्व चमत्कार करता येतात, पण भगवंताला शरण जाणे फार कठीण आहे.

नामस्मरण करू लागलो तर विषय हात धुऊन मागे लागतात. म्हणजे मी आतबाहेर विषयाने किती भरलेला आहे ! तथापि काही झाले तरी दृढनिश्चयाने नाम चालू ठेवावे. प्रपंच करीत असताना नाही का वाईट विचार



## महाराज म्हणतात

मनात येत ? मग परमार्थ करीत असता तसे आले म्हणून भ्यायचे काय कारण? प्रह्लादाने एकदा नाम घेतले ते शेवटपर्यंत काही सोडले नाही; त्या नामानेच तो तरला, त्या भावनेनेच तो उद्धरून गेला. म्हणून ही भावना वाढविण्याकरिता आपण नामाचे अखंड स्मरण ठेवावे.

आपली पापे मनात आणू नयेत. माझा पूर्व संस्कार मी आपल्या बुद्धीनेच ठरवितो, नाही का ? स्वत:चे मनच स्वत:ला खाते याला काय करावे ? काल झालेले आज नाही सुधारता येणार; पण चालू क्षण मात्र वाया दवडू नका. निराश कधीच होऊ नका. प्रत्येक साधन आपल्या परीने श्रेष्ठच आहे. साधनाला पतिव्रतेसारखे मानावे. भगवंताचे होणे हे सर्व साधनांचे आणि धर्माचे मूळ आहे हे पक्के ध्यानात ठेवावे. प्रपंच पुरा होण्याकरिता आपण मरेपर्यंत काम करतो, मग भगवंताचे होण्याकरिता, भगवंत जोडण्याकरिता, थोडे कष्ट का घेऊ नयेत ? खरोखर, भगवंताचा विसर पडणे ह्याहून दुसरे मोठे पाप नाही. देव हवा असे वाटणे ही देवाची बुद्धी, आणि विषय हवा असे वाटणे ही देहाची बुद्धी. वासना म्हणजे देवाच्या विरुद्ध असलेली आपली इच्छा. ही वासना, म्हणजेच विषयांचे हवे-नकोपण जसजसे कमी होईल, तसतशी बुद्धी नामांत स्थिर होत जाईल. अशा तऱ्हेने, ङ्ग तू आहेस, मी नाही म ही स्थिती जेव्हा नामस्मरणाच्या योगाने आपली होईल, तेव्हाच परमेश्वर आपण जोडला किंवा मी परमेश्वराचा झालो असे सार्थपणाने म्हणता येईल. निदिध्यासाने आनंदसाक्षात्कार होणे हाच मोक्ष होय.

दैनिक ग्रामोद्धार हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक धनंजय रा. जाधव यांनी अजित ऑफसेट प्रिंटर्स १६८ अ रविवार पेठ, पोवई नाका, सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक ग्रामोद्धार कार्यालय २२८ रविवार पेठ, पोवई नाका सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संस्थापक, संपादक - स्व. रामचंद्र बा. उर्फ भाऊसाहेब जाधव, संपादक - धनंजय रा. उर्फ बापूसाहेब जाधव, कार्यकारी संपादक - अजितसिंह रा. जाधव, व्यवस्थापकीय संपादक चंद्रसेन जाधव. फोन नं. : (०२१६२)२३४२३२, २३८५१४, फॅक्स - २३८६६९. फलटण विभागीय कार्यालय : सागर अपार्टमेंट, डेक्कन चौक, लक्ष्मीनगर, फलटण. मोबा : ९९६०९१००२० Email-gramodharstr@gmail.com या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद- विवाद सातारा न्यायकक्षेत.

# कोयना वसाहतीत स्व. जयमाला भोसले स्मृती उद्यानाचे भूमिपूजन उत्साहात

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** कोयना वसाहत (ता. कराड) येथे स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यान साकारण्यात येत आहे. या स्मृती उद्यानाचे भूमिपूजन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोयना वसाहतीमधील शिवराज सोसायटी परिसरात स्व. जयमाला जयवंतराव भोसले यांच्या नावाने स्मृती उद्यान उभारण्यात येणार आहे. या स्मृती उद्यानात लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी उभारण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी आरामशीर बैठक व्यवस्था करण्यात येणार असून, त्यांच्यासाठी वॉकिंग ट्रॅकही साकारण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना डॉ. सुरेश भोसले म्हणाले,



**स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यानाच्या भूमिपूजनप्रसंगी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधताना डॉ. सुरेश भोसले व डॉ. अतुल भोसले.**

स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यान लहान मुलांपासून, तरुण पिढी ते ज्येष्ठ लोकांना उपयुक्त ठरणार आहे. या उद्यानामुळे कोयना वसाहतीच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे.

डॉ. अतुल भोसले म्हणाले, कराड परिसरातील सर्वात प्रतिष्ठित जागांपैकी कोयना वसाहत हा परिसर आहे. डॉ. सुरेशबाबांच्या संकल्पनेतून हे उद्यान उभारले जाणार आहे. याचे लवकरच काम चालू करणार आहोत. त्यासोबतच कोयना वसाहतीतले सर्व रस्ते हे लवकरात लवकर चांगल्या दर्जाचे करण्यात येणार आहेत. कोयना वसाहतीला जास्तीत जास्त निधी देऊन सर्व सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यास मी कटीबद्ध आहे.

प्रारंभी कोयना वसाहत येथे महाराष्ट्र शासनाच्या मनरेगा अंतर्गत अतिरीक्त राज्य कुशल निधीतून, १० लाख विकास निधीच्या सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता कामाचे भूमिपूजन डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमास य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, शिवराज सोसायटीचे चेअरमन शंकरराव थोरात, व्हा. चेअरमन डॉ. बाळासाहेब वाठारकर, संचालक बालिश थोरात, सुधाकर गुरव, शरद पाटील, डॉ राजेंद्र पाटील, चंद्रकांत खिलारे, सुहास पवार, उत्तम जाधव, प्रियांका कुलकर्णी, सुजाता पवार, सचिव नितीन सांडगे, कोयना वसाहतीच्या सरपंच सुवर्णा वळीव, उपसरपंच उमेश कुलकर्णी, ग्रा. प. सदस्य विनायक कुलकर्णी, चंद्रशेखर पाटील, सम्राट पाटील, निलेश भोपते, रजनी गुरव, सुनीता भोसले, संगीता पाटील, कुसुम पुजारी, शीतल जाधव, महेश कुलकर्णी, नंदू कुलकर्णी, प्रदीप जाधव, डॉ. अविनाश पाटील, अशोक जकाते , कृष्णा भुसारी, विजय दुर्गावळे, सुरेश शिंदे, अशोक गुरव, किशोर जकाते, बिपीन मिश्रा, उमेश गुरव व ग्रामविकास अधिकारी दीपक हिनुकले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. बाळासाहेब पाटील यांनी निवासस्थानी कुटुंबियांसमवेत केली श्री गणेशाची प्रतिष्ठापना



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराडः** राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री माननीय आमदार बाळासाहेब पाटील यांनी मंगळवार पेठ, कराड येथील निवासस्थानी कुटुंबियांसमवेत श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली व राज्यातील जनतेला सुख समृद्धी प्राप्त होउ दे अशी श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना केली.

याप्रसंगी प्रकाश पाटील(बापू), जशराज पाटील (बाबा), सागर पाटील (दादा), सौरभ पाटील (तात्या), दिग्विजय पाटील, पार्थेश पाटील, वल्लभ पाटील, ध्रुवतेज पाटील, कु.गार्गी पाटील, कु.नारायणी पाटील, कु.रुद्रायणी पाटील उपस्थित होते.

यावेळी आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले, आज राज्यामध्ये श्री गणेशाचे आगमन होत आहे, गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय, योगायोगाने महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस पडलेला आहे, काही ठिकाणी नुकसान झालेले आहे, परंतू भविष्यामध्ये शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

आणि या उत्साहाच्या वातावरणात श्री गणेशाचे आगमन होत आहे, आणि गणेशोत्सवाचे दहा दिवस उत्साहात व शांततेत साजरे करावे असे सांगून राज्यातील जनतेला श्री गणेश चतुर्थी व गणेशोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# पी.डी.पाटीलसाहेब यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सह्याद्रि कारखाना कार्यस्थळावर बुधवार दिनांक ११ रोजी जंगी कुस्त्यांचे खुले मैदान

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**मसूरः** सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आदरणीय पी.डी. पाटीलसाहेब यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सह्याद्रि सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर बुधवार दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी २.०० वाजता रोख पारितोषिकाच्या जंगी कुस्त्यांचे खुले मैदान सह्याद्रि सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील कुस्ती आखाड्यात आयोजित करण्यात आले आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील तरुणांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि होतकरू पैलवानांना संधी मिळावी यासाठी आदरणीय स्व.पी.डी.पाटीलसाहेब यांनी कारखाना कार्यस्थळावर सन १९८१ पासून गणेशोत्सव काळामध्ये वजनगटानुसार वार्षिक मानधनावरील ऑलम्पिक पद्धतीच्या कुस्ती स्पर्धा व रोख पारितोषिकाच्या जंगी कुस्त्यांचे खुले मैदान भरवण्यास सुरुवात केली होती, तद्नंतर कारखान्याचे चेअरमन, आमदार बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने मैदान भरविण्याची परंपरा सुरू ठेवली असून, सदरचे मैदान आदरणीय पी.डी.



पाटीलसाहेब यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भरविण्यात येते.

दरम्यान रविवार दिनांक ८ आणि ९ सप्टेंबर रोजी वार्षिक मानधनावरील वजनगटानुसार ऑलम्पिक पद्धतीच्या कुस्ती स्पर्धेस सुरूवात झाली आहे. व रोख पारितोषिकाच्या जंगी कुस्त्यांचे खुले मैदान बुधवार दिनांक ११ सप्टेंबर रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे, कुस्तीमैदानास पावसामुळे व्यत्यय येऊ नये म्हणुन कारखान्याचे संचालक जशराज पाटील (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्ती आखाड्यास पत्र्याचा मंडप घालण्यात आला आहे. तसेच कुस्ती शौकीनांसाठी सुसज्ज बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा आदींची व्यवस्था करण्यात आली आहे.

या मैदानामध्ये उपमहाराष्ट्र केसरी पै.प्रकाश बनकर विरूद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै.महेंद्र गायकवाड, महाराष्ट्र केसरी पै. हर्षद सदगीर विरूद्ध पै.माऊली कोकाटे, पै.किरण भगत विरूद्ध पै.आशिष हुड्डा, पै.रविराज चव्हाण विरूद्ध पै. बिन्ना, पै. दादा शेळके विरूद्ध मुन्ना झुर्जुके, पै.सुबोध पाटील विरूद्ध पै.वैभव माने, पै.प्रशांत शिंदे विरूद्ध पै.महारूद्र काळे यासह महाराष्ट्रातील अनेक नामवंत मल्लांच्या असंख्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सह्याद्रि कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक मानधनावरील वजनगटानुसार ऑलम्पिक पद्धतीच्या कुस्ती स्पर्धा व रोख पारितोषिकाच्या जंगी कुस्त्यांच्या खुल्या मैदानासाठी होतकरू पैलवानांनी आणि कुस्ती शौकीनांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# एम.पी.एस.सी.मध्ये वडगावचा सुपुत्र सर्वप्रथम ग्रामस्थानी काढली सवाद्य मिरवणूक

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज :** श्री जयराम स्वामींचे वडगाव (ता. खटाव ) येथील किरण रवींद्र घार्गे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत ३०७ गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. त्याची वैद्य मापन निरीक्षक या पदासाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल ग्रामस्थ व मित्र मंडळाच्या वतीने त्याची जल्लोषी मिरवणूक काढण्यात आली.



**एम. पी. एस. सी. परीक्षेत राज्यात प्रथम येणाऱ्या किरण घार्गे यांचा सत्कार करताना मान्यवर.**

किरणचे प्राथमिक शिक्षण जयराम स्वामी वडगाव येथील प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण जयराम स्वामी विद्या मंदिर येथे झाली. उच्च व माध्यमिक शिक्षण सातारा येथील सयाजीराजे विद्यालयात तर महाविद्यालयीन शिक्षण वाय .सी .कॉलेज सातारा येथे झाले . शासकीय महाविद्यालय कराड येथे त्यांनी बी. इ .इलेक्ट्रिकल ही पदवी संपादन केली. त्याचे आई-वडील शेती व किराणा व्यवसाय करतात किरण ने दुसऱ्या प्रयत्नात यश संपादन केले. याबाबत किरण घार्गे यांनी सांगितले की कुटुंब व गावासाठी काहीतरी करू शकलो याचा अभिमान आहे. पहिल्यापासून प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा होती कोणतेही कोचिंग क्लासेस न लावता दिवसातील दहा ते बारा तास अभ्यास करत हे यश मिळवले आहे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रयत्न करायचा सोडायचा नाही यश हे मिळतेच आपली नकारात्मक मानसिकता बदलून नेहमी सकारात्मक राहिले तर अभ्यासात त्याचा फायदा होतो .पुढील चार महिन्यात त्याचे रांची झारखंड येथे प्रशिक्षण होणार आहे त्याच्या या यशाबद्दल जयराम स्वामी वडगाव गावचे ग्रामस्थ यांनी संपूर्ण कुटुंबाची गावातून मिरवणूक काढण्याचे ठरवले तसेच बँड व फटाक्यांनी गावातून मिरवणूक काढून त्याचे स्वागत केले .

मिरवणूक व नागरी सत्कार कार्यक्रमास मठाधिपती विठ्ठल स्वामी महाराज, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष घार्गे यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .

यावेळी ग्रामपंचायत सरपंच सौ. सुशीला पिसे उपसरपंच राजेंद्र मुरलीधर घार्गे , सदस्य ऋषिकेश घार्गे, दिगंबर उबाळे, सुशांत गायकवाड तसेच सौ. शुभांगी विकास घार्गे योगिता कुंदप ,उषाताई पवार, समीना मुलांनी गा वि.का.स सेवा सोसायटीचे चेअरमन नानासो जयसिंग घार्गे, व्हाईस चेअरमन कृष्णात बजरंग गलांडे व सदस्य महेश पतंगराव घार्गे, दादासो आत्माराम घार्गे, अनिल संपत पवार, संदीप भोसले, सचिन सुतार ,हरिभाऊ उबाळे लिलाबाई फाटक, शालन भोसले, प्रकाश बाबुराव घार्गे, अनिल घार्गे, सुहास शिंदे किरण घार्गे , उत्तम घार्गे, पी. आय .डॉ. बाबासो चिंचकर, विकास घार्गे, मारुती पवार ,संजय होनराव, नजीर मुलांनी तुकाराम कुंभार आदि उपस्थित होते.

# सर्वांना बरोबर घेऊन चांगले टीमवर्क करणार: सोनाली विभूते

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज:** अधिकारी व सर्व शिक्षकांना बरोबर घेऊन चांगले टीम वर्क करनार आहे असे प्रतिपादन नूतन गटशिक्षण अधिकारी सौ. सोनाली विभूते यांनी केले. खटाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, विषय शिक्षक यांचा सत्कार कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी मावळत्या गटशिक्षण अधिकारी प्रतिभा भराडे विस्तार अधिकारी सौ संगीता गायकवाड, चंद्रकांत सुतार, दिलीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रतिभा भराडे यांनी जर्मन भाषा आत्मसात करणे. तसेच जर्मन देशात कुशल कारागीराना असलेली कामाची संधी याबाबत मार्गदर्शन केले.तर संघाचे नेते सुनिल सावंत यांनी अधिकाऱ्यांनी गुरुजींना रात्री, अपरात्री फोन, मेसेज



**खटाव तालुका शिक्षक संघाच्या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवर.**

करून नाहक त्रास न देण्याची मागणी केली.

यावेळी केंद्रप्रमुख राजेंद्र भोसले,नितीन खोत,गावडे साहेब,राजेंद्र बागल,प्रताप पाटोळे,संजय दिडके,रफिक मुलाणी,सुर्यवंशी साहेब,धनाजी पवार,निकाळजे साहेब, कुचेकर साहेब तसेच मुख्याध्यापक सुनिल सावंत, राजेंद्रकुमार कर्पे, दिपक जगदाळे, दादासाहेब शिंदे, आलमगीर मुल्ला,द्रौपदी जाधव, शिवाजी कदम,सीमा कदम,कल्पना चव्हाण,विषय शिक्षक प्रकाश सानप यांचाही सत्कार करणेत आला .

यावेळी सौ मालती खाडे , दिपक जगदाळे, राजेंद्रकुमार भोसले, चंद्रकांत सुतार,सौ . संगिता गायकवाड यांचीही मनोगते झाली.कार्यक्रमास दीपक गिरी, शहाजी खाडे,चंद्रकांत मोरे,जयकर खाडे,माधव मदने,सूर्यकांत कदम,विष्णू पाचांगणे,कल्पना खाडे,रेखा जाधव,सुनंदा काळे,मालती खाडे,प्रशांत जाधव,विठ्ठल राऊत,गौतम कोकाटे,विजयकुमार खाडे,राजेंद्र सानप,अजित चव्हाण,चंद्रशेखर खरात,शिवाजी विठ्ठल खाडे, जावेद शेख निला देवकर,अनिता खाडे, रुपाली मदने, संगिता सोनवणे,प्रकाश देशमुख,शिवाजी गणपत खाडे, शरद सानप, महादेव मदने,बाबासो माने,धनाजी चव्हाण, श्रीकांत भंडारे, कमलाकर गुजरे,किशोर फाळके ,बाबासाहेब केदार,फरास सर,सुरेश सर्वगोड यांची विरोष उपस्थिती होती. तालुका अध्यक्ष जयकर खाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले .

माधव मदने सरचिटणीस यांनी आभार मानले .अजित चव्हाण यांनी सुत्रसंचालन केले.


**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग,**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ४११०११**
**कार्यकारी अभियंता, ताकारी विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, वारणाली, सांगली.**
**दुरध्वनी क्रमांक ०२३३-२३०४४३३**
**ई-मेल - eetelid@gmail.com**
**निविदा सुचना क्र. ०३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, ताकारी विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, सांगली, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे **''ड'' वर्गातील व त्यावरील परवानाधारक विद्युत** निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत, सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ताकारी विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, सांगली यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही, सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | बांबवडे टप्पा क्र. २ (विस्तारीत) उपसा सिंचन योजनेकरीता वाढीव विद्युत वाहिनी यांची पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे. |
| **जिल्हा** | सातारा |
| **निविदेची किंमत रु.** | २,१९,३६२/- |
| **निविदा उपलब्ध कालावधी** | दिनांक ०९/०९/२०२४ ते दिनांक २०/०९/२०२४ |
| **निविदा सादर करण्याचा दिनांक** | दिनांक २४/०९/२०२४ सांय. ५.३० वाजेपर्यंत |
| **निविदा उघडण्याचा दिनांक** | दिनांक २५/०९/२०२४ सकाळी १२.३० वा. (शक्य असलयास) |

**जा.क्र. काअ/तावि(विवयां) उसिंवि/लेशा-३/११२०/२०२४**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**ताकारी विद्युत (विवर्या) उपसा सिंचन विभाग,**
**वारणाली, सांगली ४१६ ४१५.**
**दिनांकः २८/०८/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**ताकारी विद्युत (विवयां) उपसा**
**सिंचन विभाग, सांगली**

**(जिमाका/सातारा/जा/१२२/२०२४-२०२५)**

# कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञान न घेता प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करावे : दिलीप गुरव

ग्रामोध्दार वृत्तसेवा

**कराड :** शिकवता शिकवता आपणास आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य शिक्षक विद्यार्थ्यांना देतात. कृषी विद्यार्थी हे देशाचे आधारस्तंभ आहेत. शेती क्षेत्रातील घेतलेले ज्ञान, तुमचे अनुभव व कष्ट व तुमच्या मनातील आत्मविश्वास हिच तुमच्या यशाची गुरूकिल्ली आहे. नोकरीच्या वेळेप्रमाणे कृषी विद्यार्थ्यांनी शेती कसल्यास व ज्या मातीतून सोन्यासारखे अन्नधान्य पिकते त्या मातीशी अंतहृदयाने संवाद साधल्यास यश तुमचेच आहे विद्यार्थ्यांनी नेहमी आयुष्यात वाचनाची सवय ठेवावी, तंत्रज्ञानाचा वापर गरजेवेळी करावा पण तंत्रज्ञानाला तुमचा वापर करू देवू नका. कृषी क्षेत्रात पुढे जावून त्यात मास्टर व्हा. नुसती कृषीची डिग्री असून चालत नाही तर अनुभवाची डिग्री घेवून काम करावे. विद्यार्थ्याने पुस्तक हातात धरल्यास मस्तक शाबूत रहाते अन मस्तक शाबूत राहिल्यास दुस-या समोर नतमस्तक व्हायची वेळ येत नाही. कृषि विद्यार्थ्यांनी नुसतेच पुस्तकी ज्ञान न घेता कृषीचे प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन कराड अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप गुरव यांनी केले.

माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शासकीय कृषि महाविद्यालय, कराड येथे शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ते बोलत होते.



यावेळी कृषि महाविद्यालय, कराडचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव पाटील, प्राध्यापक डॉ. आर. आर. हसुरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. शिवाजीराव पाटील म्हणाले, मला आतापर्यंत घडविलेल्या माझे आई, वडील, शिक्षक, माझा मित्र परिवार यांच्या सहकार्या मूळे व मागदर्शनामुळे मी आज यशस्वी आहे. त्या सर्वांबद्यल मी कृतज्ञता व ऋण व्यक्त करतो. जीवनात चांगले कर्म केले तरच सुख येते. विद्यार्थ्यांनी आपल्या आई, वडील, शिक्षक यांनी तुमच्या जीवन यशस्वी होण्यासाठी घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवून व विज्ञाननिष्ठ बनून जीवनात काम करावे द्रोणाचार्य नसते तर अर्जुन घडला नसता, निवृत्तीनाथ नसते तर ज्ञानेश्वर नसते, जिजामाता नसत्या तर शिवाजी महाराज घडले नसते. गुरूविना जीवन नाही त्यामुळे गुरूंना आपल्या आदरास्थानी ठेवून विद्यार्थ्यांनी आपले जीवन घडवावे.

तत्पूर्वी शिक्षक दिन कार्यक्रमाची सुरवात प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार व दिपप्रज्वलन करून झाली. यावेळी प्रमुख पाहुणे दिलीप गुरव यांचा पुष्पगुच्छ, शाल व ममहात्मा फुले कृषि विद्यापीठ डायरी -२०२४फदेवून सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीप गुरव यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले व मान्यवरांच्या हस्ते कृष्णा हॉस्पिटल ब्लड बँक, कराड यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचा गुलाबपुष्प व प्रमाणपत्रे देवून सत्कार करण्यात आला. यावेळी कृषि विद्यार्थ्याने सर्व शिक्षकांचा गुलाबपुष्प देवून सत्कार केला.

या शिक्षक दिन कार्यक्रम प्रसंगी सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. आर. हसुरे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. यु. एस. बोंदर, विद्यार्थीनी गंधाली कुलकणी, सानिका पठान, ऋतुजा देवकर, अमृता कांबळे व गीतांजली निंबाळकर यांनी आपली शिक्षक दिनानिमित्त मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती बाबर व सानिका पाटील यांनी केले. प्रास्ताविक साक्षी फडतरे यांनी केले तर आभार प्रदर्शन गीता कांबळे यांनी केले. शिक्षक दिन कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सतीश बुलबुले, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. इंदिरा घोनमोडे व कांबळे, सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सह्याद्रि कारखान्यावर वार्षिक मानधनावरील ऑलिम्पिक पद्धतीच्या कुस्ती स्पर्धेस प्रारंभ

ग्रामोध्दार वृत्तसेवा

**मसूर :** सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब यांच्या पुण्यस्मरणानिमित्त, सह्याद्रि सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर ऑलिम्पिक पद्धतीच्या वार्षिक मानधनावरील कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक माननीय जशराज पाटील (बाबा) यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत आखाड्याचे पूजन करून करण्यात आले. यावेळी खुल्या गटातील पैलवान ऋतिक उमापे विरुद्ध सचिन मुळीक यांची कुस्ती मान्यवरांच्या उपस्थितीत सलामी देऊन लावण्यात आली.



सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कारखाना कार्यस्थळावर कारखाना कार्यक्षेत्रातील तरुणांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि होतकरू पैलवानांना संधी मिळावी यासाठी १९८१ पासून गणेशोत्सव काळामध्ये वजनगटानुसार वार्षिक मानधनावरील ऑलम्पिक पद्धतीच्या कुस्ती स्पर्धा व रोख पारितोषिकाच्या जंगी कुस्त्यांचे खुले मैदान भरवण्यास सुरुवात केली होती, तद्नंतर कारखान्याचे चेअरमन, आमदार बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने मैदान भरविण्याची परंपरा सुरू ठेवली असून आज वार्षिक मानधनावरील कुस्त्याना सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील अंतिम सामने बुधवार दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी खुल्या कुस्त्यांच्या जंगी मैदानावेळी घेण्यात येणार आहेत.

दरम्यान पै.सतीश डांगे (विरवडे) यांच्या शुभहस्ते श्री हनुमान प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले.

याप्रसंगी डी.बी.जाधव, पै.संजय थोरात, रामदास पवार, संजय कुंभार, बाळासाहेब सूर्यवंशी, दिलीप पवार सर, विनायक पाटील, किरण पवार, सतिष डांगे, आबासाहेब पाटील, सुनील पोळ, दिगंबर डांगे, रघुनाथ पवार, शंकर पोळ, तुकाराम जाधव, आनंदराव चव्हाण, दत्ता ढाणे, सिद्धार्थ चव्हाण, गणेश नलवडे तसेच कुस्तीगीर व कुस्तीशौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोपुज येथे वृक्षारोपण संपन्न

ग्रामोध्दार वृत्तसेवा

**सातारा :** नेहरू युवा मंडळ गोपुजच्या पुढाकाराने संपूर्ण गावात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. होतकरु युवकांमुळे परीसराने हिरवी शाल पांघरली आहे.असे गौरवोद्गार सत्यवान कमाने यांनी काढले.ऍड.संतोष कमाने म्हणाले,दरवर्षीप्रमाणे वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे काम आम्ही करीत असतो. यावेळी बाळासाहेब चव्हाण, विनोद खराडे, कांताशेठ खराडे, जयपाल डावरे,वैभव घार्गे (वनाधिकार), ड.रणजीत चव्हाण, चेतन घार्गे, संजय गुरव,रोहित खराडे,वाघ,मदने व मान्यवर उपस्थित होते.

# तेजज्ञान ग्रंथ रथ साताऱ्यात दाखल !

ग्रामोध्दार वृत्तसेवा

**सातारा :** तेजज्ञान ग्रंथ रथाचे आगमन सातारा नगरीत झाले आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. तेजज्ञान फाऊंडेशन अर्थात, हॅपी थॉटस या आध्यात्मिक संस्थेचे संस्थापक सरश्री यांची ४०० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वाचन संस्कृती आणि ज्ञानलालसा जोपासण्याच्या उद्देशाने तेजज्ञान फाउंडेशन अर्थात हॅपी थॉटस् संस्थेच्यावतीने महाराष्ट्र भ्रमणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात तेजज्ञान ग्रंथ रथाचे आगमन सातारा येथे झाले. डॉ.राजेंद्र माने म्हणाले, हॅपी थॉट्स म्हणजे जीवन जगण्याचा सकारात्मक विचार करणे. बदलता भोवताल जागतिकीकरण आणि थोड्याफार अर्थाने सर्वच प्रकारात येणारे सपाटीकरण याने सर्वसामान्य माणसाच्या जगण्यावर एक विचित्र ताण येत असतो. अशावेळी सकारात्मक विचार करत जगण्याला सुगंध देणे हे महत्त्वाचे असते. हे परिवर्तन माणसात घडायचे असेल तर त्यासाठी हॅपी थॉट सारखी विचारसरणी मदत करणारी आहे.याला आधार देणारी आणि विचार देणारी हॅपी थॉट्सची अनेक विविध पुस्तके आहेत.एक चांगला विचार सुद्धा समृद्ध, सजग जगण्याचा मार्ग निर्माण करू शकतो.

या ग्रंथ यात्रेतले ग्रंथ माणसाचे आयुष्य आनंदी परिपूर्ण समृद्ध करायला नक्कीच मदत करतील त्याचा लाभ सर्वांनी घ्यायला हवा. तरी या ग्रंथ रथाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीन विकासासाठी अत्यंत उपयुक्त असलेली पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध केली आहेत. त्याचा लाभ सातारा शहरातील नागरीकांनी घ्यावा. या प्रसंगी बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर यांना पुस्तक भेट देण्यात आली. सदरच्या कार्यक्रमास वाचक व साधक उपस्थित होते.

# नैवेद्यासाठी बनवा स्वादिष्ट, खजुराचे लाडू



गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीसाठी खास पदार्थ बनवू शकता. यामुळे बाप्पा प्रसन्न होऊन तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण करतील. चला तर आज पाहुयात खजूर लाडू कसे तयार करायचे

दरवर्षीप्रमाणे यंदाही ७ सप्टेंबरला गणेश चतुर्थी साजरी होणार असून, त्याची बाजारपेठा, सार्वजनिक मंडळं आणि घरांमध्ये तयारी सुरू झाली आहे. दहा दिवसांचा गणेश उत्सव गणेश चतुर्थीच्या दिवसापासून सुरू होतो आणि अनंत चतुर्दशीला संपतो. या उत्सवात विविध प्रकारचे पदार्थ बनवून गणपतीला अर्पण केले जातात. अशात गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीसाठी खास पदार्थ बनवू शकता. यामुळे बाप्पा प्रसन्न होऊन तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण करतील. चला तर आज पाहुयात खजूर लाडू कसे तयार करायचे

खजूर लाडू साहित्य -

२५ खजूर बिया काढून
अर्धी वाटी बदाम भरडसर वाटून
१/२ कप किसलेले सुके खोबरे, गुलाबीसर भाजून
१ टेस्पून तूप
१ टीस्पून खसखस
वेलदोड्याची पूड
बदाम, मनुका, काजू, पिस्ता

खजूर लाडू कृती -

खजुराचे लाडू बनवण्याआधी खजूर पूर्णपणे स्वच्छ करून घ्या. नंतर खजुर बारीक करून एका भांड्यात अलगद ठेवा. यानंतर कढईत तूप टाकून वितळवून घ्या.

नंतर त्यात नारळ आणि सर्व ड्रायफ्रुट्स घालून साधारण १-२ मिनिटे परतून घ्या. यानंतर हे भाजलेले ड्रायफ्रुट्स प्लेटमध्ये काढा. मग या कढईत एकदा तूप टाकून वितळवून घ्या. यानंतर त्यात पीठ घालून ते ब्राऊन होईपर्यंत चांगले परतून घ्या.

नंतर एका मोठ्या भांड्यात या सर्व गोष्टी एकत्र करून नीट मिक्स करा. यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर त्यातून मध्यम आकाराचे लाडू बनवा.

वळताना हाताच्या तळव्यांना थोडे तूप लावावे. आता तुमचे उर्जेने भरलेले खजूर लाडू तयार आहेत.

खजूर हे एक अतिशय शक्तिशाली ड्रायफ्रूट आहे जे कार्बोहायड्रेट्स, लोह, फायदेशीर चरबी, आहारातील फायबर, फॅटी ऍसिडस्, कॅल्शियम, पोटॅशियम आणि प्रथिने यांसारख्या गुणधर्मांचे भांडार आहे.

# पान १ वरुन

## १५०० ची किंमत काय

का? लाच घेता का? असे म्हणतात. विरोधकांकडून केवळ सरकारच्या योजना खोट्या असल्याचा आरोप केला जातो. त्यामुळे सोन्याचा चमचा तोंडात घेऊन येणाऱ्यांना या रुपयांची काय किंमत, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर धारदार टिकास्त्र सोडले आहे.

त्याचबरोबर सरकारने महिलांना एसटीमध्ये पन्नास टक्के सवलतीचे तिकीट दिले. हा निर्णय घेताना एसटी तोट्यात येईल, असे विरोधक बोलत होते. पण आज या निर्णयामुळे एसटी फायद्यात आली आहे. मी आयुष्यात कधी खोटे बोललो नाही, कधीही फसवणार नाही. माझ्याकडे येणारा एकही व्यक्ती खाली हाती जाणार नाही, एवढी मोठी शक्ती मला द्यावी, असे मागणे मी परमेश्वराकडे करतो, असेही एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणात म्हटले.

## दीड दिवसाचा गणपती

नये यासाठी वाहतूक पोलिसांनी कंबर कसली आहे. तसेच सशस्त्र पोलीस, क्युआरटी, एसआरपीएफ, दंगल नियंत्रण प्लाटून, बीडीडीएस, जलद प्रतिसाद पथक ठिकठिकाणी तैनात करण्यात आले आहे. शिवाय पोलिसांच्या मदतीला होमगार्ड, नागरी संरक्षण दलाचे जवान तसेच एनएसएस, आरएसपी, एनसीसीचे स्वयंसेवक तैनात ठेवण्यात येणार आहेत.

तीन हजार वाहतूक पोलीस, ५०० ट्राफिक वॉर्डन वाहतूक व्यवस्था सांभाळणार आहेत. गरज भासल्यास या ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातूनदेखील नजर ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस नियंत्रण कक्षातून सांगण्यात आले.

तर ठाणे पोलिस आयुक्तालय परिक्षेत्रासह ग्रामीण जिल्ह्यातील ४१ हजार दीड दिवसांच्या घरगुती आणि सार्वजनिक गणपतींचे विसर्जन गुरूवारी सायंकाळी साश्रू नयनांनी करण्यात आले. रायलादेवी, उपवन, आंबेघोसाळे, टिकुजीनिवाडी, बाळकूम, खारेगाव आदी ठिकाणी कृत्रिम तलावांची पालिकेने निर्मिती केली होती. त्याचप्रमाणे तलाव परिसरात ठिकठिकाणी निर्माल्य कलशही उभारण्यात आले होते. तसेच वैद्यकीय पथक, अग्निशमन दल, विद्युत व्यवस्था, खाणपान सेवा, ध्वनिक्षेपण यंत्रणा आदी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर शहरात सार्वजनिक आणि खाजगी असे मिळून ४० हजार गणेशमूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. यापैकी नऊ हजार दीडशे गणेशमूर्तींचे विसर्जन दीड दिवसांनी करण्यात आले.

कल्याण-डोंबिवली शहरातून सुमारे ११ हजार ९५० दीड दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. कल्याण परिसरात साडेतीन हजार तर डोंबिवली परिसरात आठ हजार ४५० अशा दीड दिवसांच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. ढोलताशांच्या गजरात व गुलाल उधळत बच्चे कंपनीसह थोरामोठय़ांनी लाडक्या गणरायाला निरोप दिला.

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलिस ठाणे हद्दीतील ४५० गणेशमूर्तींचे काटेमानिवली गणेशघाट, तिसगाव तलाव, चिंचपाडा खदाण, नांदिवली तलाव आणि उल्हासनदी या ठिकाणी विसर्जन करण्यात आले. कल्याण पश्चिमेतील अडीच हजार तर बाजारपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ५५० गणेशमूर्तींचे गणेशघाट, मोहने येथील उल्हासनदी, गौरपाडा तलाव, दुर्गाडी गणेशघाट, रेतीबंदर खाडी तर डोंबिवली ग्रामीण परिसरातील तीन हजार ३०० गणेशमूर्तींचे तर विष्णुनगर परिसरातील चार हजार गणेशमूर्तीचे रेतीबंदर खाडी, कोपर गाव, जुनी डोंबिवली खाडीत विसर्जन झाले.

गर्दी होऊ नये, कचरा इतरत्र टाकू नये, यासाठी महापालिकेने जय्यत तयारी ठेवली होती. यावेळी सायंकाळी पावसाने हजेरी लावल्याने विसर्जनात काही वेळ अडथळा निर्माण झाला.

## उभं न राहिलेलं बर

निवडणुकीला न उभे राहण्याचे संकेत दिले. यावेळी कार्यकर्ते यांनी गोंधळ केला.दादा तुम्ही स्वतः उभे राहा, दादा काहीही करा पण तुम्हीच उभा राहा कार्यकर्त्यांचा सल्ला, अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या.मागील आठवड्यात खासदार सुनील तटकरे बारामतीत आले होते. ते म्हणाले, बारामतीचे तुम्ही हे काय केले आहे? काम केलं तरी असं कसं होतं? मी म्हणालो, मला माहिती नाही, काम करायचं आपल्या हातात आहे. निवडून द्यायचं लोकांच्या हातात, असे अजित पवार म्हणाले.

## जितेंद्र आव्हाडांचे आव्हान

नाही. के सी पाडवींना तर इतकं घालून पाडून बोलायचे, ते कॅबिनेट मंत्री आहेत, आदिवासी असले म्हणून काय झालं? असंही त्यांनी सांगितलं.

## जरांगे-मुंडेंची गुप्त भेट

अद्यापही धनजय मुंडे यांनी अशी भेट झालीच नाही या मतावर ठाम आहेत. या भेटीचा टायमिंग सुद्धा विशेष आहे. कारण आजच मनोज जरांगे पाटील हे परळीमध्ये घोंगडी बैठक घेत आहेत आणि त्याच बैठकीच्या आधी या दोन नेत्यात गुप्त चर्चा झाली.

या आधीही दोन-तीन वेळा चर्चा

खरंतर ही भेट होण्याआधीच जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्यामध्ये दोन ते तीन वेळा चर्चा झाली होती. अर्थात ही चर्चा होते मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे. धनंजय मुंडेंना मनोज जरांगे पाटील हे फोन लावत होते. मात्र धनंजय मुंडे हेसुद्धा पीक नुकसानीचे पाहणी करत असल्यामुळे त्यांच्याशी बोलणं होत नव्हतं. मात्र त्याच दिवशी धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे पाटील यांच्या चर्चा झाली. ती चर्चा केवळ पीक नुकसानीची होती.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी बीड जिल्ह्यामध्ये सभांचा सपाटा लावला होता. त्यांनी भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या विरोधात प्रचाराची मोहीम उघडल्याची चर्चा सुद्धा झाली. त्याचा परिणाम म्हणून पंकजा मुंडे यांचा पराभव सुद्धा झाला.

विधानसभेतही मराठा वि. ओबीसी वाद?

आता विधानसभेचे उमेदवार हे धनंजय मुंडे असणार आहेत आणि अशाही परिस्थितीमध्ये पुन्हा बीड जिल्ह्यातील निवडणूक ही मराठा विरुद्ध ओबीसी अशीच होईल अशी चर्चा आहे. त्याचा पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे आणि जरांगे पाटलांची भेट झाल्याची चर्चा आहे. या भेटीत आरक्षणावर चर्चा झाली असल्याचे जरी मनोज जरांगे सांगत असले तरी या भेटीचे परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीवर कसे होणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## मंकिपॉक्सचा संशयित रुग्ण

संपर्क ट्रेसिंग चालू आहे, असंही मंत्रालयाने म्हटलं आहे. सध्या कोणत्याचीह चिंतेचे कारण नाही. कारण हे प्रकरण राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने आयोजित केलेल्या जोखीम मूल्यांकनाशी संबंधित आहे. अशा वेगळ्या प्रवासाशी संबंधित प्रकरणांना सामोरे जाण्यासाठी देश पूर्णपणे तयार आहे आणि संभाव्य जोखीम व्यवस्थापन करण्यासाठी आणि कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात आहे, असं मंत्रालयाने निवेदनात म्हटलं आहे.

एमपॉक्स म्हणजे काय?

एमपॉक्स हा प्रामुख्याने मध्य आणि पश्चिम आफ्रिकेत आढळणारा साथीचा आजार आहे. हा आजार देवीच्या रोगासारखा असतो, पण कमी संसर्गजन्य आहे. एमपॉक्स झालेल्या व्यक्तीचा वा प्राण्याचा अगदी नजीकचा संपर्क आला, तर किंवा या विषाणूने दूषित झालेले मांस खाल्ले, तर त्यातून हा रोग पसरतो. लैंगिक संबंधांद्वारेही या रोगाची लागण होऊ शकते. यामुळे गर्भावरही परिणाम होऊ शकतो.

एमपॉक्सची साथ सध्या कुठे?

संयुक्त राष्ट्रांच्या माहितीनुसार, काँगोमध्ये एमपॉक्सचा सर्वाधिक प्रादुर्भाव असून, तेथे १५ हजार ६०० जणांना संसर्ग झाला आहे, तर ५३७ जण दगावले आहेत. हा प्रादुर्भाव २०२२ पेक्षा अधिक तीव्र आहे. या रोगामुळे दगावलेल्या रुग्णांपैकी ९६ टक्के मृत्यू एकट्या काँगोमध्ये नोंदवले गेले आहेत. या आजाराची लागण प्रथमच बुरुंडी, केनिया, रवांडा आणि युगांडा या पूर्व आफ्रिकेतील देशांतही नोंदवली गेली आहे. ही साथ कशी रोखायची, याबाबत वैद्यकीय जगतात अजूनही पुरेसे ज्ञान निर्माण झालेले नाही. परिणामी, या साथीचा प्रसार जगभरात होण्याची शक्यता असून, अमेरिकेने त्यांच्या देशातील सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना दक्ष राहण्याचा इशारा दिला आहे.

# हजारो भाविकांचा मेळा, पावणेचारशे दिंड्या; शेगावात गजानन महाराज पुण्यतिथीचा उत्साह



बुलढाणा: श्री संत गजानन महाराजांच्या ११४ व्या पुण्यतिथी निमित्त आज विदर्भ पंढरी शेगाव नगरी मध्ये विदर्भासह राज्य भरातून आलेल्या आबालवृद्ध भाविकांचा मेळा जमला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून कमी अधिक ३७० दिंड्या संतनगरीत डेरे दाखल झाल्या असून संत गजानन महाराज मंदिर, परिसर आणि मंदिराकडे येणारे मार्ग भाविकांनी नुसते फुलून गेल्याचे चित्र आहे.

हजारो भाविकांची मांदियाळी, आंब्याची तोरणे, केळीची पाने आणि रंगीबेरंगी फुलांनी मंदिर परिसरात करण्यात आलेली आकर्षक सजावट, दर्शन बारी मध्ये सकाळ पासूनच लागलेल्या दीर्घ रांगा, संस्थान तर्फे उपलब्ध करून देण्यात सुविधा, शेकडोच्या संख्येतील सज्ज सेवेकरी, गण गण गणात बोते चा होणारा गजर, विठू माऊलीचा नाम जप , चोहोदिशानी शेगावात दाखल होणारे भाविक असा संतनगरीचा आज थाट आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा, खानदेश, विदर्भासह मध्य प्रदेशातील भजनी दिंड्या ज्ञ्ज्ञानोबा तुकाराममचा नामघोष करीत संत नगरीत दाखल होण्यास काल शनिवारी संध्याकाळ पासूनच प्रारंभ झाला. आज सकाळी दहा वाजेपर्यंत संतनगरीत पावणे चारशे दिंड्या दाखल झाल्याचे सांगण्यात आले. या दिंड्यांची सुसज्ज व्यवस्था गजानन महाराज संस्थान मार्फत करण्यात आली आहे.

यागाची सांगता ऋषीपंचमी ला श्रीं चा पुण्यतिथी सोहळा दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांनी आणि पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात येतो. यंदा ४ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर पाच दिवस रोज श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.यापूर्वी चार सप्टेंबर पासून प्रारंभ झालेल्या गणेशयाग व वरूणयागाची आज सकाळी १० वाजताच्या आसपास पुर्णाहूती व अवभृतस्नान ब्रम्हवृंद यांच्या उपस्थितीत पार पडले.दररोज सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० किर्तन असा नित्यक्रम होता. ४ सप्टेंबरला ह.भ.प. संदीप बुवा डुमरे कल्याण ,५ सप्टेंबर ह.भ.प. सुरेश बुवा वाकडे पुसद, ६ ला प्रशांत बुवा ताकोते शिरसोली, ७ सप्टेंबर ह. भ. प. भरत बुवा पाटील म्हैसवाडी, ८ सप्टेंबर बाळू बुवा गिरगावकर गिरगाव यांची कीर्तने पार पडली. आज रविवारी, ८ सप्टेंबर रोजी सकाळी, श्रींचे समाधी सोहळ्यानिमित्त

ह.भ.प. भरत बुवा पाटील म्हैसवाडीकर यांचे सकाळी कीर्तन पार पडले. कीर्तन श्रवण साठी भाविकांची मोठी गर्दी जमली. ९ सष्टेबर रोजी हभप श्रीधरबुवा आवारे खापरवाडी यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे कीर्तन होईल . नंतर दहीहंडी गोपाळकाला कार्यक्रम झाल्यावर पुण्यतिथी सोहळ्याची रीतसर सांगता होणार आहे. दुसरीकडे गजानन सेवा समिती व्दारे श्रींच्या ऋषिपंचमी उत्सवानिमित्त दोन दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. अग्रसेन भवन येथे काल शनिवार आणि आज रविवारी सष्टेबर रोजी सकाळी ६ वाजेपासून रात्रीपर्यंत अविरत महाप्रसाद वाटप सुरु राहीले. शेगाव, नागपूर, अकोटचा भक्त परिवार श्री गजानन सेवा समितीव्दारे ही सेवा देतो. दरवर्षी ऋषिपंचमी, रामनवमी, प्रगटदिन या उत्सव काळात श्रींच्या भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येते. यंदाही अन्नदानाची ही परंपरा समितीने कायम राखली.

भक्तांच्या सोयीसाठी श्रींचे दर्शनसाठी एकेरी मार्ग करण्यात आला . दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण मंडप, श्रींची गादी व पलंग तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था करण्यात आली .

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा दोन वर्षात आठ लाखांपेक्षा अधिक मातांनी घेतला लाभ!




मुंबई : गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान राज्यातील ८,३७,३९९ गर्भवती महिला व मतांनी लाभ घेतला आहे.

भारतात दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत मजुरीसाठी काम करावे लागते तसेच प्रसुतीनंतरही शारीरिक क्षमता नसताना मजुरीचे काम करावे लागते. परिणामी अशा गर्भवती माता कुपोषित राहून त्यांचे तसेच नवजात बाळ कुपोषित वा कमी वजनाचे जन्माला येते. यातून आरोग्याच्या समस्या निर्माण होऊन माता व बालमृत्यूचे प्रमाण वाढते हे लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने २०१७ पासून संपूर्ण देशात प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर बुडीत मजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामुळे गर्भवती महिला व मातांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहन तसेच पुरेशी विश्रांती मिळू शकते. यातून माता व नवजात बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असून या योजनेत केंद्राचा सहभाग ६० टक्के तर राज्यांचा वाटा ४० टक्के असे निश्चित करण्यात आले आहे. मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसात गर्भधारणेची नोंद केल्यानंतर एक हजार रुपये तसेच गर्भधारणेच्या सहा महिन्यांनंतर दोन हजार आणि प्रसुतीनंतर अपत्याची नोंदणी व पहिल्या लसीकरणानंतर दोन हजार रुपये दिले जातात.

गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी तीन हप्त्यांत ५,००० रुपयांची मदत दिली जाते. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर एक रकमी ६,००० रुपयांची मदत दिली जाते. त्यासाठी जन्म दाखला असणे आवश्यक असून बालकाचे १४ आठवड्यांर्यंतचे लसीकरण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात २०१७ पासून २०२२ पर्यंत एकूण ३४ लाख ९४४९ गर्भवती महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून यासाठी १४०३ कोटी ५० लाख ४६ हजार रुपये देण्यात आल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या १४ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृ वंदना योजना २ नव्या स्वरुपात देशात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थीचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. नवीन निकष पात्र लाभार्थी शोधून आशा किंवा अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थीची ऑनलाइन पीएमएमव्हीवाय सॉफ्टवेअरमध्ये लाभार्थी नोंदणी केली जाते. यासाठी शासनाने निकष निश्चित केले असून त्यात ज्या महिलांचे कौटुंबिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी असेल तसेच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच महिला, ज्या महिला ४० टक्के किंवा पूर्ण दिव्यांग आहेत, पिवळी शिधापत्रिका असलेली महिला तसेच मनरेगाचे जॉब कार्ड असलेली महिला पात्र आहेत. याशिवाय आधारकार्ड तसेच बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

राज्यात २०२२-२३ मध्ये ५,२१,७५० गर्भवती महिला व मातांना तर २०२३-२४ मध्ये १,१९,८२८ गर्भवती महिला व मातांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. गर्भवती महिलांचे आरोग्य उत्तम राहावे तसेच जन्माला आलेल्या बाळासाठी आरोग्य विभागाच्या अनेक योजना असून त्याच्या परिणामी महाराष्ट्रातील माता व बालमृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. अजूनही अनेक सुधारणा करायला वाव आहे मात्र आरोग्याला सरकारकडून कधीच प्राधान्य दिले जात नाही तसेच निधीही अपुरा दिला जात असल्याने त्याचा परिणाम योजना राबवताना होत असल्याचे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ डॉक्टरांचे म्हणणे आहे.

# अस्वस्थ मनाचे पडघम-पुस्तक परीक्षण




एखाद्या घराची खिडकी किंचित उघडी असेल तर त्या डोकावून पाहण्याचा मोह भल्याभल्यांना होतो त्यामुळेच आत्मचरित्राचा वाचक वर्ग खूप मोठा आहे.दुसऱ्याच्या आयुष्यात काय चालले आहे हे पाहणे जर इतकी स्वभाविकवृती असेल तर माणूस समोर असता त्याच्याशी संवाद करणे हेही तितकेच स्वाभाविक आहे.जिथे आपल्याच माणसाच्या मनाचा थांग आपल्याला लागत नाही तिथे दुसऱ्याच्या मनात डोकावून बघणे अधिकच कठीण बाब होऊन बसते. दुसऱ्याच्या मनाचा कप्पा किंचित किलकिला करणे साध्य होतेच असं नाही.मनाची अस्वस्थता मग ती आपली असो व इतर कुणाची,वैयक्तिक कारणाने असो वा आणखी कुठल्याही, ती संवादान दूर होऊ शकते आणि सकारात्मक काही घडू शकतं असा सूर विद्या निकम यांच्या अस्वस्थ मनाचे पडघम ह्या सार्थ शीर्षक असलेल्या ललित लेखसंग्रहात सर्वत्र गुंजत राहिलेला जाणवतो.

बागेतल्या झाडाजवळ ठराविक वेळी येऊनफ झाडाच्या बुंध्यातून उगवल्यासारखी निश्चल बसून नंतर ठराविक वेळेत निमूटपणे निघून जाणाऱ्या, परग्रहावरची वाटावी अशा एका बाई विषयी लेखीकेलाकुतूहल वाटते आणि तिच्याशी संवाद साधावा असे वाटू लागते. पॅपेतच्या परदेशी असलेल्या तरुण मुलाचा मृत्यू,हा धक्का सहन न होऊन अर्धांग वायू झालेला चर्चच्याक्वायरग्रुपमध्येव्हायोलिनवाजवणारापॅपेतचा नवरा अलेक्स ,या गोष्टीमुळे जगण्याला सामोरं जायला घाबरणारीपॅपेत लेखिकेला अस्वस्थ करते.आपले पेटी वादन बाळबोध आहे याचे लेखिकेला पुरते भान असूनही एक दिवस ती आपला हार्मोनियम घेऊन सुरांचा पक्का असलेल्या लेक्स समोर जाते.त्याचे लक्ष पुन्हा संगीताकडे वेधू पाहते आणि पॅपेतच्या मदतीने त्याला व्हॉयोलिन वाजवायला प्रवृत्त करते. त्या व्हॅयोलियनवादनातून त्या जोडप्याला सहजीवनचा नवा सुर सापडतो. आपल्या एका अल्पशा कृतीतून हे घडू शकते याचे अपार समाधान लेखिकेला लाभते.

हाती पायी धडधकट असलेले, जीवनातील लहान-सहान त्रुटी अनेकजण सहन करू शकत नाही . एवढ्या तेवढ्यासाठी देवाला आणि दैवाला वेठीस धरणाऱ्यानी सुधाकर- रेणुका या अंधयुगलांच्या भेटीचा प्रसंग वाचला तर तो त्यांच्या नुसता काळजाला स्पर्श केल्याशिवाय राहणार नाही तर जीवनाकडे बघण्याची त्यांची दृष्टी देखील सकारात्मक करील.

माणुसकीने माणसे जवळ येतात. रक्ताच्या नात्यापेक्षाही जवळीक अधिक घट्ट ठरू शकते हे अश्लेषाच्या कथेवरून ( हो. मकथाच म्हणायला हवी ) दिसते. लेखिका आणि अश्लेषा या दोघींच्या वयातले अंतर माणुसकीच्या नात्याने मिटते. हे अनामिक नाते पारदर्शी आहे.तिथे हक्क आहे पण हेवा नाही.हट्ट आहे पण अट्टाहास नाही. ह्या नात्याचा स्त्रोत निर्मळ प्रवाहासारखा पुढे वाहत राहतो याचे प्रत्यंतर ऋणानुबंध ह्या ललितांमध्ये येते.

मुंबईसारख्या महानगरात भरगच्च लोकल प्रवासात विविध वस्तू विकणाऱ्या एखाद्या महिरकणीशी मलेखिकेचे मैत्र जुळते. नियती गरागरा फिरवते आणि परिस्थिती सगळं शिकवते .वादळ वाऱ्यात सावरायला शिकवते.परिस्थितीला शरण न जाता परिस्थितीनुरूपस्वतःला बदलत ठेवणं आणि सभोवतालच्या परिस्थितीला प्रतिसाद देत राहणं म्हणजे जगणंहे लेखिकेला ट्रेन मधील फेरीवाली शिकवून जाते. अशा कष्टकरी वर्गाकडे , त्यातही ती बाई माणूस असेल तर माणूस म्हणून तिचा विचार करण्याची साक्षरता लेखिकेमध्ये ओतप्रोत भरलेली आहे हे जाणवते.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून दुसऱ्याच्या घरची धुणी भांडी करून कोल्हापूरची अनुराधा एम एस डब्ल्यू होते. लग्नानंतरच्या सर्व जबाबदाऱ्या निभावून सासरचा जाच सहन करत सामाजिक बांधिलकी म्हणून बालमजुरांना, तळागाळातल्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देते. हॉटेल ,गॅरेज,दुकानांमध्ये काम करणाऱ्याबालमजुरांची सुटका करते.त्याकरता ती मअवनी मनावाची संस्था काढते. मला रडणे आवडत नाही लढणे आवडते असं अनुराधा ठणकावून सांगते आणि विधवा ,घटस्फोटीत परितक्ता महिलांसाठी एकटी मनावाची संस्था सुरू करते.अमेरिकेतील पीस फाउंडेशन तिच्या मदतीला धावून येते. विवेक आणि प्रभावी विचार ह्या तिच्या जवळच्या भांडवलच्या जोरावर हिंसा, आरोग्य, रोजगार आणि कायदेविषयक सजगता असे चार परिवर्तनवादी प्रवाह एकत्र करून आपली चळवळ नियोजित पद्धतीने चालू ठेवते.अनुराधाचा हा प्रवास बराचसा, शतकापूर्वी पंडिता रमाबाईंनी एकला चलो रे पद्धतीने केलेल्या भारतीय स्त्री विषयक कार्याचे आणि तत्संबंधी त्यांना असलेल्या तळमळीचे स्मरण करून देणारा आहे.

शॉपिंगमॉलमध्ये माणसांची गर्दी पाहून भारतात माणसांच्या ऐवजी ग्राहक जन्माला येतो की काय ?असा प्रश्न देखील लेखिकेला पडतो. या पार्श्वभूमीवर तिला मर्ढेकरांचागणपत वाणी आठवतो. अर्धा पाव इतक्या कमी वजनाचा साबुदाणा कुरकुर न करता देणारा, पुन्हा हातावर गुळाचा खडा ठेवून आजोबांची विचारपूस करणारा गावातला वाणी तिला आठवतो.हातात पैसा नसला तरी प्लास्टिक मनी मुळे गरजेपेक्षा जास्त वस्तूंची अकारण खरेदी करण्याची मानसिकता बोकाळली आहे. लहान मुलांकडे बड्या कंपन्या ग्राहक म्हणून पाहतायत हे पालकांनी लक्षात घेऊन सावध राहण्याची गरज आहे असे प्रतिपादन करून माणसाच्या मनातील ,समाजमनातीलसुप्तावस्थेतील क्रौर्य अधिकच प्रकर्षाने अधोरेखित होते असं तिला वाटते.

विचारवंतांच्या हत्या होत आहेत. विचारवंतांना आपल्यातल्या विचारांची प्रतीकात्मक हत्या करावी लागत आहे. आपण कोणत्या युगात आहोत असा प्रश्न तिला पडतो.तिचे मन अस्वस्थ होते मनात वाचत असलेले अस्वस्थतेचे पडघम तिला चैन पडू देत नाहीत.

चिंतनशीलतेतून व व्यापक समाजहिताच्याकळकळीतून जाणवलेले प्रश्न लेखिका एकीकडे नोंदवत राहते तर दुसरीकडे हात गाडीवरचा आंबट चिंबट खाऊचा फ्लेक्स पाहून तिच्या मनातल्या शाळकरी वयातल्या आठवणी अनावर होतात. तिला सगळे शाळा सोबती आठवतात .तेव्हाच्या पाठ्यपुस्तकातील कविता आठवतात. मग त्या कवितांबरहुकूम ती एक संहिता लिहिते.पुढे रवींद्र नाट्य मंदिरात मआठवणीतल्या कवितांचा मप्रयोग होतो .या अनुभवात वाचक समरस होऊन जातात.

कार्थनेकुष्ठरोगावर औषध शोधून काढले म्हणून माझ्यासारखे हजारोकुष्ठरोगी बरे झाले.तो आमचा देव आहे असे म्हणून आपल्या उपकर्त्याच्या पुतळ्यापुढे रोज दिवा लावणाऱ्या नऊवारीतल्या वृद्ध कुष्ठरोगी ग्रामीण स्त्रीची कृतज्ञता संस्कृतीची लस या लेखातून मनाला स्पर्शून जाते .एखाद्या स्त्रीच्या पतीचा मृत्यू होणे म्हणजे ती आपल्या वासनापूर्तीसाठी उपलब्ध होण्याची शक्यता गृहीत धरणारे काही पुरुष असतात. मात्र जवळच्या नातलगाबाबतीत असा धक्कादायक अनुभव लेखीकेला आई-वडिलांचा सुरक्षित पांगुळगाडा नाकारल्यावर ऐनबत्तीशीत आला.

संपूर्ण लेखक संग्रहात ती कुठेच उद्देश वगैरे करत नाही. आयुष्याला आपण कसे सामोरे गेले हे सांगता सांगता आपली सकारात्मक दृष्टी कशी विकसित गेली हे सांगण्याचा कल दुगोचरहोतो.परिस्थितीनुरूप आपण कणखर बनत गेलो आपल्या जिभेला धार येत गेली आणि कायम हातात तलवार असलेली मझाशीची राणीफ अशी आपली प्रतिमा झाल्याची ती प्रांजळपणे कथन करते.

अमृता प्रीतमचा चौथा कमरा सारख्या स्वतःचा शोध म्हणून ती आपल्या नव्या घरात मोठ्या अक्षरात लिहिते माय लाईफ डायरेक्टरबाय मी स्वतः.मरण सुंदर असणे आणि मरण सन्माननीय असणे हया विषयीचा युथनेशिया या लेखाचे तसेच जर्जरावस्थेतील व्यक्तीला अध्यात्मिक व्याख्यान देण्यापेक्षा तिचे मरण सुलभ कसे करता येईल याविषयीच्या तिबेट मधल्या मएक्झिट हाऊस म च्या विचारांचे स्वागत करणारे लेख लेखिकेचे नुसती वैचारिक प्रगल्भता दर्शवत नाही तर आधुनिक आणि चांगल्या विचारांचे अभिसरण व्हायला पाहिजे या दृष्टीने स्वेच्छामरण व दयामरण ह्याचा सारासार विचार होऊन कायदेशीर पावले उचलली गेली पाहिजे अशी तिची भूमिका असल्याचे स्पष्ट दिसते.

आपल्या प्रिय मृत्त नातेवाईकांचे गुणविशेष आपल्या अंगी भिनवून त्याचा उपयोग इतरांसाठी करता आला तर ते करण्याची, पारंपारिक रितीरीवाजांना काळानुसार आणि आपल्या शक्यतानुसार नवा आयाम देण्याची आवश्यकता मआईची नवमी ममध्ये लेखिका लक्षात आणून देते . मैत्रिणींना ,यशस्वी विद्यार्थ्यांना किंवा एखाद्याच्या वाढदिवसाला वस्तू म्हणून आपण पुस्तक देतो. सवाष्णा स्त्रीची ओटी भरताना खणा नारळा ऐवजी पुस्तकांनी भरतो. आपण चैनीच्या वस्तूची खरेदी थांबवली असून पुस्तके मात्र खरेदी करतो. कारण पुस्तकांनी आपल्याला आत्मविश्वासाने जगण्यासंबंधीच्या सकारात्मक दृष्टिकोन दिला. आधुनिक विचार दिले.प्रतिकूल परिस्थितीत हवी असणारी शाश्वत सोबत दिली. असे लेखिका आवर्जून नमूद करते.

एका विशिष्ट वयानंतर काही माणसे देव देव करू लागतात ही वाचनवेडी लेखिका मात्र आपण पुस्तकातूनच विश्वव्यापी परमात्म्याचा आणि दुसरीकडे माणसातील माणूसपण जपण्याचा ध्यास बाळगून आहोत असं सांगते. अच्युत गोडबोले ह्या आपल्या आवडत्या लेखकावरच्या लेखात ती म्हणते, मवारा जसा ढगांना नकळत दिशा देतो तसं त्यांच्या पुस्तकांच्या पानापानाने आत्मविश्वास आणि धैर्य दिलं म ..

मकधी मिळेल दर्जा राजा मुकुटाचा म,फ्महागाई मअसे काही तुरळक लेख वैचारिक स्वरूपाच्या आहेत.लेखांची एकूण मांडणी, ममाळ्यावरून काढलेली समई ब्रासोनेचमकवल्यावर आता ती न पेटता माझ्या लिखाणाच्या टेबलावरच्या बाजूला उभी असते नऊवारीतल्या शालीन - घरदाजसुलोचनेसारखीफअशी साध्या - सोप्या सरळ अकृत्रिम शैलीत आहे.लेखिकेचा वाचन व्यासंग दांडगा असला तरी तिला प्रतिभा, अलंकृत भाषेचा सोस नाही .तिची वृत्ती चिंतनशील आहे .मनोवृत्ती संवेदनशील आहे.

डॉक्टर शंकर शेष या प्रसिद्ध नाटककाराचे मखजुराहो का शिल्पकारफ ह्या नाटकातले वाक्य , मजेव्हा विवेक नष्ट होतो तेव्हा पतनाचा रस्ता अधिकच सुंदर दिसायला लागतो म हे तिच्या मनात घर करते.कधी तिला कबीराचा दोहा आठवतो तर कधी चार्वाकच्या पायाशी जाऊन ती बसते.तर कधी गुलजारांच्या ओळी तिच्या ओठावर येतात पण उगाचच अनाठायी पेरणी मात्र ती करत नाही .

या ललित लेखांमधील लेखिकेला भेटलेली स्त्री पात्रे लक्षवेधी आहेत .बाईचा उपजत शहाणपण आणि तिचं आत्मभानदेखील अधोरेखित करते.जीवनातला साधेपणा,जिवंतपणा, सहजता टिकवण्याकरीता संहाराला सर्जनता हेच उत्तर आहे अशी चिकित्सकस्वतंत्रदृष्टी लेखिकेला गवसली आहे. वाचताना ,बघतांना आणि जगताना आलेले अनुभव लेखिकेच्या मनपटलावर पडघम वाजवू लागतात आणि त्याचे पडसाद वाचकांच्या मनावर उमटविण्यात लेखिका यशस्वी झाली आहे असं म्हणायला हरकत नाही .

**- डॉक्टर अनुपमा उजगरे**
**अस्वस्थ मनाचे पडघम**
**लेखिका :विद्यानिकम**
**अष्टगंध प्रकाशन**

# बुटका म्हणून हिणवल्या गेलेल्या नवदीपची सुवर्णझेप



पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धांमध्ये रविवारी भारताच्या नवदीप सिंगनं सुवर्णपदकाला गवसणी घातली आणि देशाच्या पारड्यात आणखी एक पदक आलं. नवदीपच्या या कामगिरीमुळे भारताचं पदकतालिकेतलं स्थान भक्कम झालं. पण नवदीपला मात्र त्याचं हे स्थान मिळवण्यासाठी करावा लागलेला संघर्ष एखाद्या चित्रपटात शोभेल असाच आहे. अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच कायम ढाल बनून उभ्या राहणाऱ्या नवदीपच्या वडिलांचं निधन झालं. पण तो धक्का पचवून मैदानात उतरलेल्या नवदीपनं देशाला नवी सुवर्णझळाळी मिळवून दिली.

४ फूट चार इंच उंची असणाऱ्या नवदीपनं तब्बल ४७.३२ मीटर भालाफेक करून सुवर्णपदक आपल्या नावावर केलं. सुरुवातीला नवदीप दुसऱ्या क्रमांकावर होता. त्यामुळे त्याचं रौप्यपदक निश्चित झालंच होतं. पण पहिल्या क्रमांकावरच्या इराणच्या सादेह बैत सयाहला गैरवर्तनामुळे अपात्र ठरवण्यात आल्यानंतर नवदीपचं सुवर्णपदक निश्चित झालं.

जन्मापासूनच सुरू झाला नवदीपचा संघर्ष

नवदीपचा या सुवर्णपदकापर्यंतचा प्रवास त्याचं प्रशिक्षण सुरू होण्याच्याही कित्येक वर्षं आधीपासून, म्हणजे अगदी त्याच्या जन्मापासूनच सुरू होतो. बुआना लाखू या हरियाणातल्या एका गावात २००० साली नवदीपचा जन्म झाला. वेळेआधीच म्हणजे सातव्या महिन्यातच नवदीप जन्माला आला. त्यानंतर जवळपास दोन वर्षांनी त्याच्या आई-वडिलांना समजलं की त्याला कमी उंचीची समस्या आहे. त्याचे वडील पंचायत समितीचे पदाधिकारी होते, तर आई त्याला उपचारांसाठी दिल्ली आणि रोहतकला घेऊन जायची. पण त्या उपचारांचा फारसा काही परिणाम झाला नाही.

लहानपणी गावातल्या शाळेत शिकत असताना नवदीपला बुटका म्हणून प्रचंड हेटाळणीचा सामना करावा लागला. त्याच्यासोबत शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून सगळेच त्याची हेटाळणी करायचे. नवदीप लहानपणी स्वत:ला खोलीत कोंडून घ्यायचा. मग बरेच दिवस बाहेरच येत नव्हता. आजूबाजूची सगळी मुलं त्याला बुटका म्हणून चिडवायची, अशी आठवण नवदीपचा मोठा भाऊ मनदीप शेरन सांगतो.

माझे वडील दलवीर सिंग मग त्याला पुस्तकं आणून द्यायचे, त्याच्याशी गप्पा मारायचे, त्याला धीर द्यायचे. प्रोत्साहन द्यायचे. दोन महिन्यांपूर्वीच आमच्या वडिलांचं निधन झालं. पण आज नवदीपचं जागतिक स्तरावरचं हे सर्वोच्च स्थान पाहून आमच्या वडिलांना सर्वाधिक गर्व वाटला असता, अशा शब्दांत मनदीपनं इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना त्याच्या भावना व्यक्त केल्या.

अवघ्या १२व्या वर्षी राष्ट्रीय पुरस्कार

गावातल्या सरकारी शाळेत शिकतानाच नवदीपनं ॲथलेटिक्समध्ये सहभाग घ्यायला सुरुवात केली. अनेक शालेय, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि पुढे राष्ट्रीय स्तरावरही त्यानं स्पर्धा जिंकल्या. २०१२ मध्ये म्हणजेच वयाच्या १२व्या वर्षी नवदीपला राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

आमचे वडील कुस्तीपटू होते. नवदीपनंही सुरुवातीला स्थानिक पातळीवर कुस्ती खेळायला सुरुवात केली. पण त्याच्या पाठीच्या दुखण्यामुळे त्याला कुस्तीपटू बनण्याच्या स्वप्नावर पाणी सोडावं लागलं. मग त्यानं शाळेत ॲथलेटिक्समध्ये भाग घ्यायला सुरुवात केली. तेव्हा तो दिव्यांग विद्यार्थी गटाबरोबरच सामान्य गटातही स्पर्धा खेळायचा. त्याला जेव्हा राष्ट्रपतींकडून पुरस्कार मिळाला, तेव्हा सगळ्या गावानं त्याचा सन्मान केला, असंही मनदीप सांगतो.

पुरस्कार मिळाल्यानंतर चार वर्षांनी म्हणजे २०१६ मध्ये नवदीपनं दिल्लीत प्रशिक्षणाला सुरुवात केली. नवल सिंग यांच्या हाताखाली नवदीप तयार होऊ लागला. त्याच्या कामगिरीच्या जोरावर २०१९ मध्ये त्यानं स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या वर्ल्ड पॅरा ज्युनिअर चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक मिळवलं.

नीरज चोप्राच्या कामगिरीमुळे नवदीप प्रभावित

आम्ही जेव्हा दिल्लीला यायचं ठरवलं, तेव्हा नवदीप नीरज चोप्राच्या वर्ल्ड ज्युनिअर अंडर २० वर्ल्ड रेकॉर्डमुळे प्रभावित झाला होता. तेव्हा मी त्याला वेगवेगळ्या प्रकारचे भाले आणून द्यायचो. त्याच्या प्रशिक्षणासाठी वडिलांनी त्यांच्या एलआयसी पॉलिसीवर कर्जही काढलं होतं, असंही मनदीपनं सांगितलं.

२०१९ च्या वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिपमध्ये नवदीप ३१.६२ मीटरच्या भालाफेकीसह ९व्या स्थानावर राहिला. त्यानंतर पुढच्याच वर्षी त्यानं ४३.७८ मीटर ही वैयक्तिक सर्वोच्च कामगिरी साधली. त्या आधारावर तो टोक्यो पॅरालिम्पिकसाठी पात्र झाला. तिथे ४०.८० मीटर थ्रोसह तो चौथ्या स्थानी राहिला. तिसरं स्थान थोडक्यात हुकलं. त्यानंतर त्यानं भारताचे नॅशनल चॅम्पियन व इंडियन पॅरा टीमचे प्रशिक्षक विपिन कसाना यांच्या हाताखाली प्रशिक्षणाला सुरुवात केली.

अशी झाली नवदीपची तयारी!

नवदीपच्या आधी मी कोणत्याही कमी उंचीच्या खेळाडूला प्रशिक्षण दिलं नव्हतं. पण त्यानंतर मीदेखील त्याच्या उंचीच्या खेळाडूंना किती प्रकारे थ्रो करता येऊ शकेल, हे शिकून घेतलं. यात सगळ्यात महत्त्वाचं होतं त्याला २.२ मीटर लांबीच्या भाल्याची सवय होणं आणि त्यानं भालाफेकीसाठी लागणारी ताकद त्याच्या खांद्यांच्या मदतीने निर्माण करणं. तो कधीकधी त्याच्या रनअपमध्येच इतकी ताकद लावायचा की त्यामुळे त्याच्या थ्रोवर परिणाम व्हायचा. त्यानंतर आम्ही त्याच्या वेगावर काम केलं, अशी प्रतिक्रिया त्याचे प्रशिक्षक विपिन कसाना यांनी दिली.

नवदीपचा भाऊ मनदीपला पूर्ण खात्री आहे की तो त्याचं हे पदक कसं सेलिब्रेट करेल. तो सांगतो, नवदीप नेहमी त्याची पदकं गावातल्या लहान मुलांना दाखवतो. यावेळीही तो हेच करेल!

## फिल्मी दूनिया

# अब तो बच्चन बनना हैं

आलिया भट्टचा आगामी चित्रपट जिगरा चित्रपटगृहात दाखल होण्यासाठी सज्ज झाला आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. पहिल्यांदाच आलिया क्शन अवतारात दिसणार आहे. आलिया भट्टने पुन्हा एकदा तिची अभिनयाची क्षमता सिद्ध केली आहे. या चित्रपटात आलियासोबत वेदांग रैना मुख्य भूमिकेत असणार आहे.

अब तो बच्चन बनना है, आलिया भट्टने भावासाठी दाखवला जिगरा, जबरदस्त ॲक्शनने वेधलं लक्ष




गळसीर ढीरळश्रशी: बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टने अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. वेगवेगळ्या भूमिका साकारण्यासाठी आलियाला ओळखलं जातं. अभिनेत्रीने राष्ट्रीय पुरस्कार देखील जिंकले आहेत. गेल्या वर्षी आलियाने मरॉकी और रानी की प्रेम कहानीफ या रोमँटिक चित्रपटात काम केलं होतं. आता ती पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर तिचा ॲक्शनचा पराक्रम दाखवणार आहे.

आलिया आगामी ॲक्शन थ्रिलर मजिगराफ चित्रपटात एक दमदार व्यक्तिरेका साकारणार आहे. आलिया भट्टने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये या चित्रपटाची घोषणा केली होती. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे.

जिगरा चित्रपटाचा ट्रेलर रिलीज

जिगरा या चित्रपटात एका बहिणीची कथा आहे. जी तिचा भाऊ संकटात असताना शस्त्र उचलते. आपल्या भावाला तुरुंगातून सोडवण्यासाठी ती खूप प्रयत्न करते. ज्यामध्ये ती आगीशी खेळते, गोळ्या झाडते. एक वेळ अशी येते की ती स्वत:ची नस देखील कापायला तयार होते. वेगवेगळ्या भूमिकेत दिसणारी आलिया भट्ट मजिगराफ या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये ॲक्शन आणि इमोशनने परिपूर्ण आहे.

भावासाठी आलिया बनली बच्चन

नुकताच मजिगराफ चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमध्ये आलिया भट्टची सुरुवात वेदनादायक कथेपासून होते. ज्यामध्ये ती म्हणते की, आईला देवाने हिरावून घेतले. वडिलांनी स्वत:चा जीव घेतला. दूरच्या एका नातेवाईकाने आसरा दिला आणि रिकामे भाडे गोळा केले. सोडा भाटिया साहेब. गोष्ट खूप मोठी आहे. भावाकडे फार कमी वेळ आहे. कथा ऐकणारी व्यक्ती म्हणते की, मग कारागृहाच्या भिंती पाडूया.

या चित्रपटात मनोज पाहवा देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहे. ट्रेलरमध्ये तो सत्याला मार्गदर्शन करताना दिसत आहे. या ट्रेलरमध्ये मनोज पाहवाने मबच्चन नही बनाना है, बचकर निकलना है हा डायलॉग बोलला आहे. यावर आलिया म्हणते की, आता मला बच्चन बनायचं आहे.

जिगरा चित्रपट कधी प्रदर्शित होणार?

आलिया भट्टच्या मजिगराफ या चित्रपटाचे दिग्दर्शन वासन बाला यांनी केलं आहे. या चित्रपटात आलिया भट्ट मुख्य भूमिकेत आहे. करण जोहरच्या सहकार्याने चित्रपटाची निर्मिती केली आहे. वेदांग रैनाने आलियाच्या भावाची भूमिका साकारली आहे. हा चित्रपट ११ ऑक्टोबरला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंग झाले आई-बाबा

अखेर बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंग आई-बाबा झाले आहेत. गेल्या कित्येक महिन्यांपासून दीपिकाच्या प्रेग्नेंसीची चर्चा सुरू होती. दीपिका कधी आई होणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं होतं. दीपिका आणि रणवीर दोघं देखील पहिल्यांदा आई-बाबा होण्यासाठी खूप उत्सुक होते. अशातच आता दीपिका आई झाल्याचं समोर आलं आहे. दीपिका आणि रणवीरच्या घरी लक्ष्मी आली आहे. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्याच दिवशी, आज अभिनेत्रीने गोंडस मुलीला जन्म दिला आहे, असं वृत्त इंडिया टूडेफ्ने दिलं आहे.

अभिनेत्री दीपिका पादुकोणला काल, गणेश चतुर्थीच्या दिवशी संध्याकाळी पाचच्या सुमारास रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मुंबईच्या रिलायन्स फाउंडेशन रुग्णालयात दीपिकाला तिच्या आईबरोबर नेण्यात आलं होतं. यादरम्यानचे व्हिडीओ आणि फोटो व्हायरल झाले होते. त्यानंतर आज दीपिकाने एका गोंडस मुलीला जन्म दिल्याचं समोर आलं आहे. अद्याप दीपिका किंवा रणवीरने याबाबत अधिकृतरित्या जाहीर केलेलं नाही.

दरम्यान, फेब्रुवारी २०२४मध्ये दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंगने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून आई-बाबा होणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यानंतर दीपिकाचं बेबी बंप दिसत नसल्यामुळे फेक प्रेग्नेंसी असल्याचं म्हटलं जाऊ लागलं. अनेक कार्यक्रमात अभिनेत्री हाय हिल्समध्ये फिरताना दिसली. त्यावरूनही तिला ट्रोल केलं गेलं. पण काही दिवसांपूर्वी दोघांनी मॅटर्निटी फोटोशूट करून ट्रोलर्सची तोंड बंद केली.

त्यानंतर डिलिव्हरीला जाण्याआधी दीपिका आणि रणवीरने सिद्धिविनायकाचं दर्शन घेतलं. यावेळी दोघं आपापल्या कुटुंबियांबरोबर पाहायला मिळाले. लग्नाच्या सहा वर्षांनंतर दीपिका आणि रणवीरच्या घरी पाळणा हलला आहे. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्याच दिवशी दोघांच्या आयुष्यात चिमुकल्या पाहुणीचं आगमन झालं आहे.

अभिनेत्री दीपिका पादुकोणच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती अलीकडेच नाग अश्विनच्या कल्कि २८९८ एडी चित्रपटात झळकली होती. या चित्रपटात दीपिका प्रभास, अमिताभ बच्चन आणि कमल हासन यांच्याबरोबर पाहायला मिळाली होती. आता दीपिका लवकरच रोहित शेट्टीच्या सिंघम अगेनफ चित्रपटात महिला पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. यात तिच्यासह पती रणवीर सिंग, अजय देवगण, करिना कपूर, अर्जुन कपूर आणि जॅकी श्रॉफसह तगडी कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत.



# पूजा सावंत खास बाप्पासाठी मायदेशी परतली

प्रसिद्ध मराठी अभिनेत्री पूजा सावंत खास गणेशोत्सवासाठी भारतात परतली आहे. काही महिन्यांपूर्वीच पूजाने लग्न केले आहे. लग्नानंतरचा तिचा हा पहिलाच गणेशोत्सव आहे. लाग्नानंतर अभिनेत्री ऑस्ट्रेलियाला तिच्या पतीबरोबर गेलेली होती. तिचा पती सिद्धेश चव्हाण ऑस्ट्रेलियातील एका फायनान्स कंपनीत कामाला आहे. पूजाने गणपती बाप्पाबरोबरचे फोटो चाहत्यांबरोबर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचे कुटुंबीयदेखील दिसत आहेत. अभिनेत्री पूजा सावंत आणि तिचा नवरा सिद्धेश चव्हाण बाप्पाचे दर्शन घेताना. यावेळ पूजा तिचा नवरा आणि कुटुंबीय अतिशय आनंदी दिसत आहेत. पूजा सावंतच्या घरच्या बाप्पाचं विलोभनीय रूप. गणपती बाप्पांसोबत आम्हीही आमच्या घरी आलो, गणपती बाप्पा मोरया, असं कॅप्शन या फोटोंना पूजाने दिले आहे.